
डिसेंबर १९६६

ळीस पैसे

# माणूस

साप्ताहिक



# आई

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य रुपये पंचवीस

* ★ प्रसिद्धिपूर्व ग्राहकांनी आपल्या प्रती कार्यालयातून लवकर नेण्याची व्यवस्था करावी
* ★ परगांवच्या प्रसिद्धिपूर्व ग्राहकांच्या प्रती रवाना होत आहेत.

राजहंस प्रकाशन पुणे
४१९, नारायण पेठ, पुणे २





## एक समग्र साप्ताहिक

*वर्ष : सहावे*
*अंक : बावीसावा*
*किंमत : चाळीस पैसे*
*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
*अ. मा. साधू*
*दिलीप माजगावकर*
*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**
*अ. वा. गंधे*
*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.*
*दूरध्वनी – ५७३५९*



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.


# पत्रमैत्री

स. न. नोव्हें. २२

'माणूस'चा दिवाळी अंक संपूर्ण वाचून घेतला. तथाकथित ललित लिखाणावर मुळीच भर न देता इतका वाचनीय व वैशिष्टयपूर्ण अंक तुम्ही सादर केलात, याबद्दल मी तुमचे व तुमच्या सर्व सहकाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. सामान्य वाचकाच्या बुद्धीला अत्यंत नि:सत्त्व खाद्य पुरविण्याची अहमहमिका लागलेल्या या काळात 'माणूस' उद्‌बोधकता व रंजकता यांचा मेळ घालण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. तो पूर्णपणे यशस्वी होवो, असे इच्छितो.

'माणूस'च्या ' प्रतिष्ठान ' विषयी वाचीत आहे. हा प्रयोग यशस्वी झाला तर शब्द आणि कृती यांचे जे अतूट नाते गेल्या काही वर्षांत निखळू लागलेले आहे, ते पुन्हा सांधणारे दृश्य जनतेला दिसेल. तिला दिलासा मिळेल.

**वि. स. खांडेकर, कोल्हापूर.**

स. न. नोव्हें. १३

मला रोटरी मशीनच्या तांत्रिक गोष्टींविषयी फारशी कल्पना नाही, पण आपल्या अंकाचा आकार मात्र थोडा विक्षिप्त वाटला. मजकूर मात्र खास वाचनीय वाटला. व्यंगचित्रे खुसखुशीत आहेत. साधारणपणे कविता म्हटल्या की जास्तीत जास्त एक ' Inevitable Evil ' म्हणून पाहण्याची वृत्ती अधिक. पण तुम्ही त्यांना योग्य त्या मानाने वागवले आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. ' असा पती असा पिता ' हा लेख एका अत्यंत जवळच्या व्यक्तीनेच लिहिला असल्यामुळे त्यात अपरिहार्यपणे येणारी

मळमळीत भावुकता आहे. पण शास्त्रींसारख्या एका अवचित भाग्यक्षणी हजर राहिलेल्या सामान्य व्यक्तिमत्त्वाच्या चरित्रातून एखादे ' Legend ' निर्माण करण्याचा प्रयत्न फारसा यशस्वी होणं कठीणच आहे, हे माझे वैयक्तिक मत.

जुन्या काळच्या पतिव्रतेने पतीचे नाव घ्यावयाचे नसे त्याप्रमाणे वर्तमानपत्राने आपल्या प्रतिनिधीचे नाव द्यायचे नाही, असा दंडक आहे की काय कोणास ठाऊक ? हा अनामिक, "आमचा प्रतिनिधी" म्हणजे तर मला भूमितीतील एखाद्या चौकोनासारखी आकृती हातात पॅड-पेन्सिल घेऊन हिंडत असल्यासारखी वाटते ! इंग्रजीमध्ये असल्या बाबतीत 'as told to' असं लिहून लेखकाचे नाव दिलेले असते. हंसा वाडकरच्या निवेदनाचे संकलन इतके सुरेख आहे, की तुम्ही ते प्रसिद्ध करा अगर न करा, मला मात्र कधी तरी 'off the record' ते नाव कळवा. कारण हा लेख साऱ्या अंकातला जिवंत लेख ! कोणतीही खंत नाही, वैताग नाही, अशा स्वरूपात मनमोकळेपणाने सांगितलेल्या या हकीकतीत विलक्षण ताजेपणा आहे. तसा मी सिनेमाचा शौकीन नाही. मी शेवटचा हिंदी चित्रपट सोळा-सतरा वर्षांपूर्वी पाहिला. राज कपूर, दिलीप कुमार यांचा एकही चित्रपट न पाहिलेल्यास जर काही कोणाचे इनाम असेल तर ते माझ्या पत्त्यावर पाठवावे. पण 'रिकामा देव्हारा' सारख्या चित्रपटातील इंदिराबाईंचं गाणं मला अजून आठवतं. 'पुढचं पाऊल'मधील हंसा वाडकरही बरीच यशस्वी वाटली होती. पण हे लेख आवडले, याचे कारण म्हणजे ते बेगुमान जीवन, विशेष म्हणजे त्याबद्दल नंतर न वाटणारी ती मळकट, चिकट, घाणेरडी पश्चात्तापाची भावना. आणखी एक वैयक्तिक मत सांगायचे म्हणजे ही हकीकत जर एकाच अंकात आली असती तर कधीकाळी मी एक कथा आपणांस मोफत दिली असती. अंकाबद्दल पुन्हा आभार.

**जो. ए. कुलकर्णी**, धारवाड.

स. न. नोव्हें. १४

श्री. सदाशिव पेठकर यांचा लेख मला फार आवडला. श्री. पुरंदरे यांच्या गोष्टीतील काही भाग, 'असा पती असा पिता' उत्तम आहे. अंक ताजातवाना आणि इतर दिवाळी अंकांपेक्षा एकदम वेगळा आहे.

**श्री. ज. जोशी**, पुणे.

स. न. नोव्हें. २२

परवाच 'माणूस'मधील 'हंसाबाई वाडकर' यांचा आत्मनिवेदनपर लेख वाचला. त्या लेखामुळे पुढील लेख वाचण्याची उत्सुकता वाढली; यात वाद नाही.

पण मला ते 'आत्मचरित्र' वाटले नाही. कारण, एकतर ते माहितीवजा आणि अत्यंत ढोबळ झाले आहे. हंसाबाईंची व्यक्तिरेखाही ह्या ढोबळपणाने गुदमरून गेलेली वाटते. शिवाय त्यांच्या आयुष्यात येणाऱ्या व्यक्ती मनासमोर जिवंत उभ्या राहतच नाहीत.

खरे तर त्यांच्या आत्मचरित्राच्या

आधाराने तयार केलेला तो लेख वाटला. आत्मचरित्र नव्हे.

पण लेख म्हणून तो नक्कीच वाचनीय आहे. आणि नटीचे अनुभव काय असतात, ह्याचीही ढोबळ कल्पना त्यावरून येते. पण यातून ती 'माणसे' जिवंतपणे उभी राहत नाहीत.

'कश्मीर'वरील लेख मला आवडला. त्यामुळे अंकाचे वजन वाढले आहे. बाकी ठीक.

**आनंद यादव, पुणे.**

**स. न.** **नोव्हें. ११**

चालू दिवाळी अंक अंगाने ऐसपैस व प्रशस्त असल्याने डोळ्यांत भरतो. मला आपला नेहमीचा साइजच जास्त सोईस्कर वाटतो. आपली 'माणूस प्रतिष्ठान'ची कल्पना जरा आगळी व स्तुत्य वाटते. अर्थात या आपल्या चांगल्या कल्पनेचीसुद्धा माफक टिंगल होते. (पाहा–'ललित' दिवाळी अंक, पान १२३)

अंकाच्या अंतरंगात गेल्यास खूप समाधान वाटते. दोन्हीही राजकीय लेख सखोल व वाचनीय आहेत. हंसा वाडकरची आत्मकथा हे तर खरेच आपण टाकलेले धाडसाचे पाऊल आहे. एका मराठी नटीच्या जीवनातील सत्यकथन मराठी वाचकाला खरंच रोचक वाटेल, यात शंका नाही. व्यंगचित्रे सामान्य आहेत.

**अनंतराव पाटील, नागपूर.**

**स. न.** **नोव्हें. १०**

'माणूस' दीपावली अंक विकत घेऊन वाचला. केवळ अप्रतीम आहे. तुम्ही या अंकाचे मूल्य फार कमी ठेवले. इतका सुंदर अंक काढल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.

'सुपे योजना' ठीक आहे. पण एक सूचना–ते कार्य हाती घेण्यासाठी सरकार आहे, त्यासाठी 'माणूस'वर परिणाम होऊ देऊ नये. महाराष्ट्राचा विकास म्हणजे जगन्नाथाचा रथ. या सेतुबंधनात चिमुकल्या खारीचे कार्य तुम्ही करावे. पण तेवढेच. अवजड शिळा वाहून नेऊ नयेत.

कारण महाराष्ट्राला सुसंस्कृत करणे, उच्च अभिरुची निर्माण करणे, अक्षराची गोडी लावणे हे 'माणूस'चे खरे कार्य होय.

**अनंत मनोहर, बेळगाव.**

**स. न.** **नोव्हें. १९**

'माणूस' दिवाळी अंक अतिशय सुरेख व वाचनीय आहे. सर्वच लेख छान आहेत.

श्रीमती हंसा वाडकर यांनी अत्यंत प्रामाणिकपणाने लिहिलेले चरित्र उल्लेखनीय आहे. 'पूर्व रंगातल्या रात्री' हा लेख खुसखुशीत आहे. श्रीमती शास्त्री यांचा लेख आणि श्री. पुरंदरे यांची कथा अन्तःकरणाचा ठाव घेते.

एकूण काय, की असा सर्वांगसुंदर अंक काढल्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन. माझ्या स्नेहीमंडळींना माझ्याकडचे अंक वाचायला देऊन आपले वर्गणीदार वाढावेत, असा प्रयत्न करतो आहे.

**श्रीधर शंकर लिमये, मद्रास.**

●



# ' यशवंत - तंत्रा 'चा नवा प्रयोग

तशी दिल्लीला निदर्शन ही काही नवीन गोष्ट नाही. संसदभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात कोणा तरी मंत्र्याने सरकारच्या 'नेत्रदीपक' कामगिरीचे प्रवचन सुरू केलेले असावे आणि बाहेर हे प्रवचन झूठ आहे असे कंठरवाने सांगणाऱ्या घोषणा चालू असाव्यात असे नेहमीच येथ घडते. 'आज कोणाचा मोर्चा येणार आहे हो ?' अशी चौकशी फक्त वार्ताहर आणि संसदभवनाबाहेरचे गंडेरीवाले परस्परांशी करीत असतात. एरवी संसद-भवनाबाहेरच्या मोर्च्यांची किंवा उपोषणांची इतर कोणी दखल घेत नाही.

परंतु गेल्या ७ नोव्हेंबरच्या मोर्च्याने सारी दिल्ली अक्षरशः हादरली. संसदभवनाच्या आतले आणि बाहेरचेही केवळ पाचसात लाख लोक या मोर्च्यात सहभागी झाले होते हेच त्यामागचे कारण नव्हते. अनेक भव्य मोर्चे दिल्लीकरांनी यापूर्वी पाहिले आहेत. कच्छकराराच्या वेळचा जनसंघाचा मोर्चा किंवा त्यापूर्वीचा कम्युनिस्टांचा मोर्चा काही कमी मोठा नव्हता. परंतु हे मोर्चे भव्य असले तरी उग्र नव्हते. शिवाय कम्युनिस्टांचा मोर्चा असला की त्यात कामगारांचा भरणा असावयाचा किंवा जनसंघाने मोर्चा काढला की त्यातली शिस्त नजरेत यावयाची याला दिल्लीकरांची नजर सरावली आहे. परंतु मर्त्य जगाच्या धकाधकीपासून दूर असणाऱ्या व कुंभमेळ्याच्या वेळीच दर्शन देणाऱ्या अर्धनग्न त्रिशूळधारी साधूंनी एवढ्या मोठ्या संख्येने दिल्लीत जमा व्हावयाचे आणि संसदेवर चाल करून जावयाचे हा अनुभव भारताच्या राजधानीला अगदी नवा होता. श्रमसत्ता किंवा धनसत्ता राजकारणाच्या धकाधकीत पडावी यात काही आश्चर्य नाही. परंतु धर्मसत्तेने आपला तिसरा डोळा उघडावा व राजसत्तेला शाप देण्यासाठी प्रक्षुब्ध व्हावे हा प्रकार गेल्या

एकोणीस वर्षांमध्ये प्रथमच घडला. दिल्ली हादरली ती त्यामुळे. सर्वदलीय गोहत्या महाभियान समितीच्या वतीने हा मोर्चा काढण्यात आला होता. या समितीची सूत्रे जनसंघाकडे आहेत. त्यामुळे या मोर्च्यात भाग घेणाऱ्यांनी जी दंगल व जाळपोळ केली तिची जबाबदारी जनसंघावर टाकून मोकळे होणे सरकारला आवश्यक वाटले. त्या दिवशी अवघ्या चार तासांमध्ये जवळजवळ एक कोटी रुपये किमतीच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. एवढे प्रचंड नुकसान झाले ही गोष्ट कोणीच नाकारत नाही. या दंगलीला जबाबदार कोण याबाबत मात्र मतभेद आहेत. कॉंग्रेस आणि कम्युनिस्ट यांनी जनसंघावर खापर फोडले आहे तर कॉंग्रेसमधल्याच एका गटाने या मोर्च्याचा फायदा घेऊन ही दंगल घडवून आणली असे जनसंघाचे नेते सांगत आहेत. चौकशी करा म्हणजे खरा प्रकार काय आहे तो कळून येईल, अशी रोखठोक मागणी मधोक–वाजपेयीप्रभृति जनसंघ नेते करीत आहेत.

ही दंगल नेमकी कोणी केली किंवा तिला चिथावणी कोणाची होती याबाबतची खरी माहिती कधीच बाहेर येणार नाही. आणि म्हणूनच या दंगलीसंबंधी लोकसभेत बोलताना स. का. पाटील, संजीव रेड्डी प्रभृतींकडे बोट दाखवून मधू लिमये म्हणाले, " यह लोग कैसा इन्साफ देंगे जो खुद गुनाहगार हैं ! " नजीकच्या भविष्यकाळात सत्ता हस्तगत करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या जनसंघालाही या निमित्ताने हे कळून आले की लोकांच्या भावना भडकविण्याचे काम सोपे असले तरी नंतर त्या काबूत ठेवण्याच्या कार्यात जशी कॉंग्रेस अपुरी पडते तसेच आपणही उणे ठरतो. जुन्या संघस्वयंसेवकांचा रूटमार्चसारखा निघणारा मोर्चा वेगळा आणि सर्वदलीय समितीच्या वतीने काढण्यात येणारा मोर्चा निराळा, ही गोष्ट जनसंघनेत्यांच्या ध्यानात यावयास हरकत नाही. या मोर्च्याच्या निमित्ताने जनसंघावर तोंडसुख घेण्याची संधी कम्युनिस्टांनीही दवडली नाही. ' कामराजांचा खून करण्याचाच कट होता, ' असे श्री. डांगे यांनी जाहीर करून आगीत तेल ओतण्याचा आपल्याकडून शक्य तितका प्रयत्न करून पाहिला. पं. नेहरूंच्या निधनाचा धक्का सहन न करू शकलेली कॉंग्रेस कालांतराने का होईना क्षीण होत जाईल व आजच्या तिच्या एकसंध स्वरूपाला तडा जाईल याविषयी अन्य राजकीय पक्षांना मुळीच शंका वाटत नाही. तो जेव्हा केव्हा पडेल तेव्हा सत्ता हस्तगत करण्याच्या आपल्या प्रयत्नांच्या आड कोण येईल याचा प्रत्येक पक्षाच्या नेत्यांना चांगला अंदाज असून त्या दृष्टीने या दंगलीच्या निमित्ताने होत असलेली आरोप-प्रत्यारोपांची धूळफेक बोलकी आहे.

## नंदांचा बळी

या निदर्शनाचा फायदा घेऊन कॉंग्रेस-अंतर्गत गटांमध्येही सत्तास्पर्धेच्या राजकारणाने उचल खाल्ली आणि त्यात नंदा यांचा हकनाक बळी गेला. साधूंच्या निदर्शनामुळे साधूसमाजाचा अध्यक्षच उडवला जावा हा खरा गंमतीचा प्रकार आहे

नंदाजी केंद्रीय मंत्रिमंडळातले सर्वांत जुने सदस्य. पं. नेहरूंनी १९५२ मध्ये त्यांना खास मुंबईहून दिल्लीला बोलावले. तेव्हापासून मंत्रिमंडळातली नेहरूंची माणसे म्हणून जी मंडळी ओळखली जात होती, त्यांत नंदाजींचा समावेश होता. आणि पंडितजींची कन्या त्यांच्या पदावर आरूढ झालेली असताना, मंत्रिमंडळातील नेहरू विरोधकांपासून तिने आपला बचाव करण्यास नकार द्यावा या गोष्टीचे नंदांना अतीव दुःख झाले. आपला राजीनामा सादर करताना त्यांनी जे इंदिरा गांधींना पत्र लिहिले आहे त्यात ही बोच स्पष्ट दिसून येते. राजकारणाची वक्रगती म्हणतात ती हीच. चिनी आक्रमणाच्या वेळी कृष्ण मेनन यांना लोकक्षोभाच्या तोंडी देताना पंडितजींनी हा वक्रगतीचाच मार्ग अवलंबिला. त्यामुळे पाटील आणि रघुनाथसिंग हे पट्टीचे राजकारणपटू पक्ष-बैठकीत नंदांवर तुटून पडले असताना नेहरू-कन्येने मूग गिळून बसावे यात अस्वाभाविक असे काहीच नाही.

नंदा पंडितजींप्रमाणेच मध्यममार्गी समाजवादी. आपल्याला पटेल ते धोरण कार्यवाहीत आणण्यासाठी अंगी जो ताठरपणा लागतो त्याचा पंडितजींप्रमाणेच अभाव. त्यातून पक्षसंघटना त्यांच्यामागे उभी नाही. त्यामुळे प्रशासनातील भ्रष्टाचार दूर करण्यासाठी—निदान कमी करण्यासाठी—त्यांनी पावले टाकण्यास प्रारंभ करताच हितसंबंधी लोकांकडून त्यांना विरोध होऊ लागला. अखिल भारतीय काँग्रेस कचेरी-तील सुनीलरंजन दास याला त्यांनी हात लावताच अतुल्यबाबू खवळून उठले. अतुल्य-बाबू खवळल्यामुळे पाटीलदादा, संजीव रेड्डी हा त्यांचा गोतावळाही खवळला.

त्यातून नंदा प्रधानमंत्रीपदाच्या भोज्याला दोनदा शिवून आलेले. मंत्रिमंडळातला क्रमांक दोन त्यांनी बळकाविलेला. त्यामुळे येत्या निवडणुका होण्याचा आत नंदाजींची उचलबांगडी करण्याची मोरारजी गटाच्या रघुनाथसिंगांना तातडी वाटली. त्यांनी सिंडिकेटची मदत घेऊन नंदांना राजीनामा देण्यास भाग पडले. नंदाजी बाहेर पडावेत असे मोरारजी देसाई, स. का. पाटील यांना वाटत होते तसेच इंदिराबाईंच्या सल्लागारांनाही वाटत होते. बाईंचे सल्लागार तीन. अशोक मेहता, सुब्रह्मण्यम व दिनेशसिंग. सध्या दिल्लीत मंत्रिमंडळाच्या आतले मंत्रिमंडळ म्हणून या तिघांना ओळखले जाते. त्यातून इंदिरा गांधी प्रधानमंत्री झाल्यापासून पर-राष्ट्र खात्यात दिनेशसिंगांचा भाव वधारलेला आहे. पंडितजींच्या मध्यममार्गी समाजवादाच्या आसपासच ही मंडळी उभी आहेत. त्यामुळे नंदांची अडचण त्यांनाही जाणवत होती. एवढी सारी मांडामांड झाल्यानंतर व सर्व संबंधितांनी 'पोझीशन्स' घेतल्यावर एकाकी नंदांचा काय निभाव लागणार!

नंदांच्या राजीनाम्याची संधी साधून मनुभाई शहा व सचिंद्र चौधरी यांना मंत्रिमंडळातून अर्धचंद्र देण्याची कल्पना अशोकभाईंना स्फुरली व इंदिरा गांधींच्या घरी सकाळच्या चहासाठी हे त्रिकूट जमले असताना अशोकभाईंच्या कल्पनेचा सुब्रह्मण्यम व दिनेशसिंग यांनी पाठपुरावा केला. या साऱ्या बनावाची पूर्वतयारी

झाली तेव्हा इंदिरा गांधी यांनी आपला हा बेत कामराजांना कळविला. परंतु दोन तीन महिन्यांकरिता एवढे महत्त्वाचे बदल करून असंतोष वाढवू नका, असा कामराजांनी सल्ला दिल्यामुळे चौधरी-शहा यांच्या हकालपट्टीची सकाळी आठ वाजता शिजलेली योजना दुपारी चार वाजता बारगळली. नंदांनी रिकामे केलेले गृहमंत्रीपद कोणाला द्यावयाचे हा प्रश्न तेवढा शिल्लक उरला होता.

## नवे तंत्र

श्री. यशवंतराव चव्हाण यांचीच गृहमंत्रीपदावर नेमणूक करावी, या इंदिरा गांधी यांच्या विचाराला 'अंतर्गत मंत्रिमंडळा'ने पाठिंबा दिला. एक तर चव्हाण मंत्रिमंडळातल्या कोणत्याच गटात दाखल झालेले नाहीत. शिवाय जसे या 'अंतर्गत मंत्रिमंडळा'ला पक्षसंघटनेत स्थान नाही तशी चव्हाणाची परिस्थिती नाही. किंबहुना चव्हाण हे एकटेच असे मंत्री आहेत की त्यांच्या नेतृत्वाला आव्हान देणारा महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसमध्ये कोणीही प्रतिस्पर्धी नाही. चव्हाणांच्या नावाचा छगला, स्वर्णसिंग, फकरुद्दिन अहंमद प्रभृति अलिप्तांनीही पुरस्कार केला.

परंतु चव्हाणांना गृहमंत्रीपद देण्याने आज ना उद्या आपला घात होणार आहे हे स. का. पाटील यांना पक्के माहीत आहे व म्हणून त्यांनी निजलिंगप्पा यांना पुढे करून चव्हाणांच्या नावाला कडाडून विरोध केला. दोन-चार दिवस पुन्हा वाटाघाटींचा घोळ होत राहिला. सारेच मंत्रिमंडळ अस्थिर व अनिश्चित वातावरणात वावरत होते. कामराजांनी पुन्हा एकच सांगितले, "गृहमंत्री कोणास करावयाचे हे तुम्ही ठरवा. पण जे ठरवावयाचे असेल ते लवकर ठरवा."

कामराजांचा हा आग्रह कळल्यामुळे इंदिरा गांधी श्री. मोरारजी देसाई यांच्या निवासस्थानी गेल्या व 'गृहमंत्रीपद स्वीकारता का' अशी त्यांनी विचारणा केली. मोरारजी फेब्रुवारीच्या तयारीत गुंतले आहेत. प्रधानमंत्रीपदाचा शेवटचा सामना देण्यासाठी सर्व शक्तीनिशी प्रयत्न करण्याच्या तयारीत असताना तीन महिन्यांकरिता, गृहमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारणे त्यांना इष्ट वाटले नाही. अशा परिस्थितीत चव्हाणांशिवाय अन्य कोणाकडेही गृहमंत्रीपद जात नाही हे स. का. पाटलांना दिसून आल्यावर त्यांनी एका अटीवर होकार दर्शविण्याची तयारी दाखवली. नंदांनी खाली केलेले गृहमंत्रीपद तुम्ही चव्हाणांना जरूर द्या, परंतु नंदांचा मंत्रिमंडळात क्रमांक दोन त्यांना देता कामा नये असे त्यांनी इंदिरा गांधी यांना बजावले. शेवटी दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी चव्हाणांना गृहमंत्रीपदाची भेट मिळाली.

एवढा सारा बनाव घडत असताना चव्हाणही सारे बारकावे ध्यानात घेत होते. 'आता नाही तर कधीही नाही' ही गोष्ट त्यांच्या ध्यानात आली व त्यामुळे त्यांनी 'क्रमांक दोन' शिवाय गृहमंत्रीपद स्वीकारण्यास मान्यता दिली. कदाचित तीन महि-

त्यांच्या अवधीत विरोधकांचे होयबांत रूपांतर करण्याची मुंबईतील आपली किमया दिल्लीतही उपयोगी पडेल असा त्यांना भरंवसा वाटत असावा. कारण एक पाटील सोडले तर इतर कोणी आपल्याला फारसा विरोध करणार नाही हे त्यांना ठाऊक आहे व फेब्रुवारीच्या निवडणुकीनंतर खुद्द पाटीलच मंत्रिमंडळात नसण्याची शक्यता अगदीच कमी नाही. इंदिरा गांधी त्या वेळी आपल्या मनाजोगते मंत्रिमंडळ बनविण्याचा आटोकाट प्रयत्न करतील असे त्यांचे निकटवर्ती सांगतात. त्या मंत्रिमंडळात आपले स्थान निश्चित आहे व विरोधकांचे भवितव्य मात्र निराशाजनक आहे हे 'साहेब' जाणून आहेत. अशा रीतीने परिस्थितीची पावले आपल्या रोखाने पडत असताना केवळ क्रमांक दोनसाठी आताच हटून बसणे योग्य नव्हे एवढे जाणण्याइतके ते चाणाक्ष आहेत.

गृहमंत्रीपद स्वीकारल्यानंतर विद्यार्थ्यांचा मोर्चा बारगळवून टाकण्यात चव्हाणांनी यश मिळविल्यामुळे नव्या गृहमंत्र्यांची सर्वांनाच दखल घ्यावी लागली. दिल्लीत प्रवेश करणारी प्रत्येक आगगाडी व बस तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. शिवाय हा मोर्चा काढण्यात आला तर तुम्हांस कठोर शिक्षा केली जाईल, असा विद्यार्थी-नेत्यांना गृहखात्याच्या अधिकाऱ्यांनी इशारा दिला होता. आठ-दहा दिवसांपूर्वी झालेली बेइज्जत सावरण्याचा गृहखात्याने प्रयत्न केला आणि त्याचे श्रेय नव्या गृहमंत्र्यांना मिळाले.

परंतु पुरीच्या शंकराचार्यांना अटक करून त्यांनी आपल्या नव्या कणखरपणाचे दर्शन घडविले हे मात्र मान्यच केले पाहिजे. वस्तुतः, विरोधकांना चुचकारण्याच्या व शक्य झाल्यास त्यांना खिशात टाकण्याच्या तंत्रात चव्हाण कुशल आहेत. त्यांची ख्याती या 'यशवंत-तंत्रा'साठीच आहे. परंतु शंकराचार्यांना हात लावताना हा 'यशवंत स्पर्श' त्यांनी हेतुतः बाजूला ठेवल्याचे दिसते. शंकराचार्यांना हात लावण्यामागचे धोके यशवंतरावांनाही माहीत आहेत. परंतु जनसंघाचे आव्हान स्वीकारण्याचा त्यांनी निर्धार केलेला दिसतो. महाराष्ट्रातील विरोधी शक्ती खच्ची करण्यासाठी शंभर टक्के यशस्वी ठरलेला तो 'यशवंत-स्पर्श', धर्मसत्तेच्या आधाराने उभे राहू इच्छिणाऱ्या नर्मदेपलीकडच्या जनसंघाशी वागताना यशवंत होणार नाही असा त्यांनी कयास बांधला असावा! सरदार पटेल, गोविंद वल्लभपंत या जुन्या खंबीर पोलादी गृहमंत्र्यांसारखी आपली प्रतिमा निर्माण करण्याचे यशवंतरावांनी ठरविले असावे. कारण येत्या तीन महिन्यांत आकार घेणारी प्रतिमाच अंतिम सत्तास्थानाच्या रोखाने जाणारी त्यांची वाटचाल निश्चित करणार आहे. त्या दृष्टीनेच त्यांनी हा पैजेचा विडा उचलला आहे.

—सदाशिव पेठकर

•

# टुकाफळे...



## ☐ कामराजांना डॉक्टरेट

कामराज यांना लवकरच डॉक्टरेट मिळणार आहे. जोधपूर विश्वविद्यालयान हा निर्णय घेतला आहे. इतकी चांगली बातमी बरेच दिवसांत आली नव्हती ! सर्वसाधारणत: डॉक्टरेट ही विद्वानांना मिळते तेव्हा कामराजांना ती' मिळते आहे याबद्दल कोणाचे दुमत होणार नाहीच. कामराज हे झाकले माणिक आहे. ते बोलत नाहीत. कामराजांची विद्वत्ता ही डोंगरे बालामृतासारखी आहे. डोंगरे बालामृताची बाटली आपण बहुधा कुणीच पाहिलेली नसते परंतु त्याने मुले गुटगुटीत व सशक्त होतात याबद्दल कुणालाही संशय नाही. कामराजांच्या विद्वत्तेचे तसेच आहे. ती दिसत नाही पण ज्या अर्थी नेहरूंनी 'कामराज योजना' ही पंचवार्षिक योजने-इतकी तातडीने स्वीकारली, त्या अर्थी ही योजना फार महत्त्वाची असली पाहिजे आणि ज्यांनी ती तयार केली तो कसलातरी 'तज्ज्ञ' असला पाहिजे. आता विश्वविद्यालयाने डॉक्टरेट दिली म्हणून कामराज आपले विद्वत्तेचे रहस्य सांगणार आहेत थोडेच ! विश्वविद्यालयाला जेवढ्या पायऱ्या असतील तेवढे शब्दखील ते बोलणार नाहीत. ते थोडके परंतु गर्भित बोलतील--

"मला डॉक्टरेट दिलीत. आभारी आहे. हे काय असते याची मी चौकशी करीन !"

वस्तुत: सर्वच विश्वविद्यालयांनी कामराजांना डॉक्टरेट देणे आवश्यक आहे. नुकताच रशियन दौरा त्यांनी केला. कोलंबसाने अमेरिका शोधून काढली त्यानंतर असा महत्त्वाचा शोध कुणी लावला नसेल. कामराजांनी सांगितले--

"रशियन राज्यक्रांतीने भारताला स्वातंत्र्यलढ्याची स्फूर्ती दिली."

१८५७ चे स्वातंत्र्य युद्ध, सावरकरांचे सशस्त्र राजकारण, धिंग्रा, चाफेकर, इत्यादींचे रशियन राज्यक्रान्तीपूर्वी झालेले सर्व फालतू स्वातंत्र्य-प्रयत्न कामराजांनी विचारात घेतले नाहीत हे बरोबरच आहे. कारण हे सगळे आपल्याला विसरायचे आहे. खुद्द महात्मा गांधींनी १९१५ मध्ये भारतात पाऊल ठेवण्यापूर्वी आफ्रिकेत काळ्यांच्या स्वातंत्र्यासाठी बरेच काही केले होते, ही गोष्टही महत्त्वाची नाही. ऑक्टोबर १९१७ मध्ये लेनिनची रक्तरंजित क्रांती झाली. त्याची चिन्हे

१९०५ मध्येच दिसू लागली होती. त्यामुळेच महात्माजींना स्वातंत्र्यलढयाची स्फूर्ती मिळाली असली पाहिजे, हा कामराजांचा तर्क आजच्या परिस्थितीत योग्य आहे ! हा तर्क आज जास्त उपयुक्त आहे ! कारण कोसिजिनमुळे आज पाकिस्तान फक्त थोडाच काश्मिर बळकावून स्वस्थ आहे. ज्या वेळी लेनिन झारची कोवळी मुले मारीत होता, माओ यादवीसाठी शस्त्रे गोळा करीत होता, त्या वेळी महात्मा गांधी भारतीय जनतेला चरखा वाटीत होते, खेडयांकडे चला सांगत होते. ही गोष्ट इतिहाससिद्ध असली तरी आज रशियन राज्यक्रान्तीने भारताला स्वातंत्र्याची स्फूर्ती दिली असे म्हणणे आपल्या हिताचे आहे. " ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी, " या न्यायाने आज आपल्याला गव्हाच्या मालकांची टाळी वाजवावी लागतच आहे. परंतु " ज्यांची मोठी आंतरराष्ट्रीय टोळी त्यांचीही वाजवावी टाळी " यासाठी कामराज झटत असतात.

स्टॅलिन युगात गांधींविषयी रशियाचे चांगले मत नव्हते, परंतु क्रुश्चेव्हयुगात रशियाला एकदम साक्षात्कार झाला, की आपले काही तरी चुकले आहे. मे १९५६ मध्ये सोविएट कम्युनिस्ट पक्षाचे पत्र ' कोम्युनिस्ट ' याने लिहिले—

" साम्राज्यशाहीविरुद्धच्या लढयात गांधींनी जी कामगिरी केली त्याच्या मूल्यमापनात काहीतरी गंभीर चुका झालेल्या आहेत ! "

लगेच सोविएट ' एन-सायक्लोपिडीया 'ने महात्मा गांधींचे कर्तृत्व फेरतपासणी करून लिहिले. आता एवढा मोठा उपकार आपल्यावर रशियनांनी केल्यानंतर कामराजांनी जरी असे सांगितले की– " रशियन राज्यक्रान्ती झाली नसती तर आम्ही काही स्वतंत्र होत नव्हतो ! " तरी फारसे बिघडत नाही. सध्या आपल्याला दोघांना सांभाळायचे आहे ! एक कोसिजीन आणि गहूवाला ' पोसि 'जीन ! आधी पोटोबा नि मग विठोबा हेच खरे. कारण–विठू माझा लेकुरवाळा आहे ना ! काय करणार ? कामराजांना डॉक्टरेट मिळालीच पाहिजे.

## □ नासरचा माईक

फील्ड मार्शल टिटो व जनरल गमाल अब्दुल नासर हे जगात शांतता टिकावी म्हणून दिल्लीत येऊन गेले. युगोस्लाव्हियावर जर्मनांनी जेव्हा आक्रमण केले तेव्हा जर्मनांना देशाबाहेर पिटाळण्यासाठी ज्याने जिवाचे रान केले तो पूर्वाश्रमीचा क्रांतिकारी कम्युनिस्ट नेता म्हणजे फील्ड मार्शल टिटो. मूळचा हा फील्ड मार्शल नंतर युगोस्लाव्हियाचा अध्यक्ष झाला. कैरोहून आलेले जनरल नासर यांचेही पूर्वायुष्य परकीयांना अरब भूमीतून पिटाळण्यात गेले. युगोस्लाव्हिया व इजिप्त य देशांचे भूभाग जेव्हा परकीयांनी लाटले होते तेव्हाही शांततेच्या शिखर परिषदा भरत होत्याच. पण तिकडे त्यांना लक्ष द्यायला त्या वेळी फुरसत नव्हती. आता ते

दोघे मोकळे झाले आहेत. भारत देश इतका स्वार्थी नाही ! पाकिस्तानने बळकावलेला काश्मीर, चीनने घशात घातलेला अक्साई चीन आणि लडाखचा भाग हे परत घेण्याचे जरी ठरले असले तरी शांततेची शिखर परिषद खुद्द दिल्लीत भरवावी याला भारताचा मुळीच विरोध नाही. लोक विचारतील, "शांततामय सहजीवनाला पर्याय नाही, हे पटविण्यासाठी मानवतेचा आवाज उठवण्यासाठी जर तुम्ही शिखर परिषदा भरवता तर दरोडेखोरांनी लांबवलेला प्रदेश परत घेण्याची योजना काय ?" याला श्रीमती गांधींनी झक्क उत्तर दिले आहे. त्या म्हणाल्या,—"लष्करी करार, थंडी लढाई, शस्त्रवाढ यांच्या कोलाहलाच्या वर अलिप्ततेने जगात आवाज उठवला पाहिजे !"

युक्ती कशी वाटली ? हा आवाज इतका मोठा उठवला पाहिजे, की परकीयांनी पळवलेल्या प्रदेशात आपले जे देशबांधव आहेत, त्यांचा आवाज आपल्यालादेखील ऐकू येता कामा नये ! मग कुठे आक्रोश नाही. शस्त्रवाढ नाही.—लढाई नाही ! नुसत्या शिखर परिषदा !

आपल्या देशात लष्करी राजवट कधीही येणार नाही, याची काळजी आपले सरकार घेते. परंतु फील्ड मार्शल टिटो, जनरल नासर यांच्या राजवटी या—"अय्या कित्ती छान आहेत !" असे सांगायला कुठली हरकत आहे ? हे सहजीवन आहे ना ? सहजीवनाच्या गप्पा मारणाऱ्या नासरला पॅलेस्टाईनचे अस्तित्व सहन होत नाही. त्याला ते सहन होत नाही म्हणून आम्हीदेखील पॅलेस्टाईनला मान्यता देत नाही. आमचे सहजीवनाइतकेच नासरवर प्रेम आहे. याचा हा पुरावा आहे. आता ही परिषद आटोपली. श्रीमती गांधी यांच्या दोन्ही बाजूंस असलेले स्वर्णसिंग आणि दिनेशसिंग आता असे गाऊ लागतील, की सगळे जग म्हणू लागेल—"हे खरे शांततेचे 'सिंगर'—नासरची व टिटोची गाणी फार छान म्हणतात !"

परिषदेच्या उद्घाटनाच्या दिवशी इंदिरा गांधींपुढचा माईक बंद पडला. शेवटी


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

नासरचा माईक उचलून त्यांच्यापुढे ठेवला व भाषण ऐकू येऊ लागले. वृत्तपत्रांनी व बातमीदारांनी या गोष्टीची नोंद चुकीची केली आहे. वृत्तपत्रांनी छापले की, लाऊड-स्पीकरच्या व्यवस्थेत बिघाड झाला म्हणून हे घडले. ही गोष्ट साफ खोटी आहे. इंदिराजींनी मुद्दामच हे आवाजाचे प्रात्यक्षिक करून दाखवले, पुढे नासरचा किंवा टिटोचा माईक ठेवल्याखेरीज बोलण्यातच अर्थ नाही !

## □ श्रीरामपूरचा शहाणा

नगर जिल्ह्यात श्रीरामपूर नामक एक सत्यवचनी गाव आहे. तेथली ही गोष्ट आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून १९ वर्षे झाली, तरी स्वातंत्र्य-सैनिकांची व्यवस्था अजून नीट लागलेली नाही. ४२ साली निदान विशी व पंचविशीत असलेली ही मंडळी आता पन्नाशीजवळ आलेली आहेत. या स्वातंत्र्य-सैनिकांचे मेळावे जागोजाग भरत असतात. आम्हांला नोकरी द्या, जमीन द्या, पोटाची सोय करा, अशा प्रखर मागण्या ही मंडळी करीत असतात...' एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज 'मध्ये नाव न नोंदवता, मागासलेल्या जातीतील उमेदवारांप्रमाणे किंवा बेकार सुवर्णकारांप्रमाणे यांना नोकरीत अग्रहक्क द्यावा, अशा काही अमूल्य सवलती महाराष्ट्र सरकारने त्यांना दिल्या आहेत. केवळ स्वातंत्र्य मिळाल्यामुळे बेकार झालेली ही एकमेव जमात आहे ! यांना 'सन्मान-पत्रके' देण्याचा समारंभ विजयादशमीला श्रीरामपूर येथे पार पडला. तुम्ही म्हणाल, ही सन्मान-पत्रके कशाकरता ? तर ती अशाकरता की यांतील स्वातंत्र्य-सैनिक म्हणून मिरवणारे काही तुरुंगात गेले होते ही गोष्ट खरी असली, तरी त्यांचा स्वातंत्र्य संग्रामाशी काही संबंध नव्हता अशा हकीकती वृत्त-पत्रातून प्रसिद्ध झाल्या आहेत. तेव्हा निदान त्यांच्यापाशी सर्टिफिकेट असले की अशी भानगड होणार नाही असा यातील उद्देश होता.

ही प्रशस्ती-पत्रके देण्याचा समारंभ श्रीरामपूरचे ४२ च्या लढ्यातील एक क्रांतीवीर अच्युतराव पटवर्धन यांच्या हस्ते करावा अशी मूर्ख सूचना कुणीतरी शहाण्याने केली. हे कोण बुवा अच्युतराव ? समारंभाशी यांचा काय संबंध ? असे चेहरे सर्व पुढे पुढे पुढाऱ्यांनी केले यात आश्चर्य नाही. कारण अशा समारंभाला पटवर्धनाला बोलवायला ही काय 'सत्यनारायणाची पूजा' आहे की काय ? ज्याने ही सूचना केली त्याला गप्प करण्यात आले व हा समारंभ केंद्रीय उपमंत्री अण्णा-साहेब शिंदे यांच्या शुभहस्ते करण्याचे अखेर ठरले.

स्वातंत्र्य-सैनिकांचे हे खरोखर भाग्य होय, की केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते त्यांना सन्मान-पत्रके मिळणार आहेत. स्वातंत्र्य-सैनिकांचे प्रश्न हाताळण्यासाठी खुर्चीतला मंत्रीच अधिक उपयोगी पडणार आहे. नुसत्या स्वातंत्र्याचा जयजयकार खरा नाही. स्वातंत्र्य–' लक्ष्मी ' की जय !

—ग्यानबा

## विचारवारे

– समीर

### □ सोव्हिएट रशियात नफ्याचे अर्थकारण

"सोव्हिएट रशियात आणि 'युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी' या राष्ट्रसमूहांत आर्थिक नियोजनांच्या उद्दिष्टांत व पद्धतींत जो बदल झाला आहे तो जागतिक अर्थकारणाच्या दृष्टीने इतका महत्त्वाचा आहे की, आशियातल्या प्रगतिशील देशांनी या बदलाचे अत्यंत काळजीपूर्वक मनन केले पाहिजे, त्यापासून धडा घेतला पाहिजे व त्याप्रमाणे आपल्या समस्या सोडविल्या पाहिजेत," असे मत थोड्या दिवसांपूर्वी डॉ. मॅक्स स्पॅन्डो या विख्यात जर्मन अर्थ-शास्त्रज्ञांनी दिल्लीत भाषण करताना प्रगट केले. त्यांनी असे भाकित केले की निरनिराळ्या देशांच्या अर्थव्यवस्थेत केंद्रीय सरकारचे कार्य आणि नागरिकांच्या व्यक्तिगत व्यावसायिक हालचाली यांच्या संबंधांत आता क्रांतिकारक बदल होण्याचा समय आला आहे. पाश्चिमात्य देशांत हा बदल नवीन कार्यक्रमाने घडून येईल, तर पौर्वात्य देशांत नवीन नियोजनाने घडून येईल.

सध्या सोव्हिएट अर्थकारणात जो नवीन प्रयोग चालू आहे त्यात व्यक्तीच्या उद्योगीपणाला सरकारचे प्रोत्साहन मिळत आहे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. आशियातील विकसनशील देशां-नीही व्यावसायिक धाडसाचा अभाव, त्यामुळे देशाच्या विकासावर होणार विपरीत परिणाम यांचा विचार करायला नको काय ? उद्योगधंद्यांचे महत्त्वाप्रमाणे अनुक्रम लावून व्यवसायी मंडळींच्या मार्गातल्या अडचणी सरकारी प्रोत्साहनाने दूर करण्याचा पद्धत-शीर प्रयत्न करण्याची कल्पना विचारार्ह नाही काय ?

प्रगतिशील देशांनी विध्वंसक सरकारी नियोजनापासून सावध राहिले पाहिजे. सोव्हिएट रशियात उत्पादन–साधनाचे केंद्रीय नियमन केल्याने जे नुकसान झाले त्यामुळेच १९६४ साली क्रुश्चे-व्हला पदच्युत व्हावे लागले. उलट यंदा जी सोव्हिएट पंचवार्षिक योजना तयार झाली आहे तिच्यात सोव्हिएट अर्थव्यवस्थेत

झालेल्या काही नवीन फरकांचे प्रतिबिंब दिसते. प्रसिद्ध सोव्हिएट विचारवंत प्रा. लायबरमन यांनी या फरकाचे वर्णन ‘समाजवादाची परकी पायरी’ असे केले आहे. सोव्हिएट रशियाने आता स्वीकारलेल्या नफ्याच्या अर्थकारणामुळे पाच वर्षांत उद्योगधंद्यांच्या उत्पादनक्षमतेत ३५ टक्के वाढ होईल, व शेतीच्या उत्पादनक्षमतेत ५० टक्के वाढ होईल अशी अपेक्षा आहे. परिणामतः उद्योगधंद्यांतील कामगारांचे वेतन २० टक्क्यांनी वाढेल आणि शेतांतल्या कामकऱ्यांचे ३० ते ४० टक्के वाढेल.

## □ इजिप्तमध्ये कुटुंबनियोजन □

नुकत्याच झालेल्या त्रिराष्ट्र परिषदेत भारत, इजिप्त व युगोस्लाव्हिया या तीन देशांचा दृष्टिकोन समान आहे असे आवर्जून सांगण्यात आले. याच नाण्याची दुसरी बाजू म्हणजे त्यांच्या–निदान भारताच्या इजिप्तच्या–समस्याही सारख्या आहेत. विशेषतः भारताला व इजिप्तला भेडसावणारा एक मोठा प्रश्न म्हणजे लोकसंख्या नियमन. आकाराने लहानशा इजिप्तची लोकसंख्या ३ कोटी असून तिच्यात दरवर्षी ८ लाख माणसांची भर पडत असल्याने लोकसंख्येचा प्रश्न भारताइतका इजिप्तलाही गंभीर वाटू लागला आहे. अर्थात भारताप्रमाणेच इजिप्तमध्येही सरकारने कुटुंबनियोजनाचे धोरण स्वीकारले आहे. तेथे हे धोरण कसे अंमलात आणले जाते आहे याची माहिती कैरो आणि अलेक्झांड्रिया विश्वविद्यालयांचे प्राध्यापक डॉ. महमूद व डॉ. वहदान यांनी थोड्या दिवसांपूर्वी दिल्लीला एका पत्रकार परिषदेत दिली.

इजिप्तमध्ये या कार्यक्रमाचा मुख्य भर लूप व संततिप्रतिबंधक गोळ्यांवर आहे. पण अशा स्वरूपाचा कार्यक्रम सुरू करण्यापूर्वी जे संशोधन व नमुन्याचा कार्यक्रम भारतात आवश्यक समजला जातो तो न करताच इजिप्तने ही मोहीम आरंभली आहे असे दिसते. पण भारताप्रमाणे इजिप्तमध्ये ती निकडीची समजली जात नाही. उलट ती दूरवरची म्हणजे सुमारे १५–२० वर्षांची योजना समजली जाते. त्यामुळे इजिप्तमध्ये हा कार्यक्रम घाईघाईने न चालता सबुरीने चालला आहे. दुसरे हेही शक्य आहे की इजिप्तमध्ये बालमृत्यूचे प्रमाण फार मोठे, म्हणजे हजारात १०० एवढे असल्याने नेहमीच्या स्वास्थ्य–समस्या तेथल्या मंडळींना सध्या पुरत आहेत.

कुटुंबनियोजनाचा प्रसार करण्यासाठी इजिप्तने सार्वजनिक स्वास्थ्य-सेवेचा उपयोग केला आहे. त्यामुळे अजून तरी डॉक्टरांची व इतर प्रशिक्षित वैद्यकीय कार्यकर्त्यांची तूट भासत नाही. परंतु खाजगी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांनाही सामील करून घ्यायला पाहिजे अशी जाणीव वाढत चाललेली दिसते.

भारताच्या व इजिप्तच्या कुटुंबनियोजन कार्यक्रमात आणखीही काही लक्षात येणारे फरक आहेत. उदाहरणार्थ, भारतात लूप येईपर्यंत कुटुंबनियोजन मोहिमेचा सर्व भर 'स्टरिलायझेशन'-वर होता. पण इजिप्तमध्ये या तंत्राला उचलून धरलेले नाही, कारण "जनता त्याच्याविरुद्ध आहे." गर्भपात बेकायदेशीर आहे इतकेच नव्हे तर त्याची सार्वजनिक चर्चादेखील होत नाही. एक विशेष लक्षात येणारी गोष्ट म्हणजे इजिप्तमध्ये कुटुंबनियोजनाला धार्मिक विरोध नाही. उलट इस्लामी धर्मपंडित त्याचे समर्थन करतात, व शुक्रवारी मशिदीत जमलेल्या जनतेपुढे मुल्ला कुटुंबनियोजन ही राष्ट्रीय गरज आहे असे प्रवचन करतो. ●


"डायमंड"

टॅक्सी व रिक्षा मीटर्स

भारतात सर्वप्रथम

डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,
११८० बुधवार पेठ, पुणे २.

डायमंड वॉच कंपनी

११७९ बुधवार पेठ, पुणे २.

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारची घड्याळे व इन्स्ट्रुमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.

# काळ काही थांबत नाही

**अरविंद दीक्षित**

" कामाची फारच जरुरी असेल तर मुलाला पाठवून द्या ! बघतो काहीतरी."

" मी एकटी आहे. अविवाहित आहे. माझा तुम्हांला त्रास होणार नाही."

माधवराव 'हो' म्हणून बसले, आणि तिथेच चुकले.

" हा आनंदाचा दिवस वारंवार येतो." माधवरावांनी तार वाचली. तारेचा कागद दूर टेबलावर ठेवीत सिगरेटच्या डबीतून सिगरेट काढून पेटवली अन् खुर्चीत रेलून बसले. " आनंदाचा दिवस अं ! अन् सुमित्रेनं तार करावी असं काय विशेष अडलं होतं ? "

सिगरेट दूर भिरकावून देत त्यांनी पेरी मेसनचं अर्धवट राहिलेलं पुस्तक उघडलं. वाचनात खंड नको म्हणून मुद्दाम त्यांनी खुर्ची अंगणात टाकायला सांगितली.

तारवाला आला तेव्हा केस नुकतीच कोर्टात गेलेली होती. खरे खटकेबाज संवाद गोष्टीचा पाया उभारणार होते, मग शेवटी अचानक कुणीतरी येऊन रहस्याचा उलगडा करणार होतं. तेच नेहमीचं तंत्र ! तोच हॅमिल्टन बर्गर, तोच पॉल ड्रेक, तोच डेला स्ट्रीट अन् पेरी ! !

सुंदर नाजूक आरोपीला सरकारी वकील धारेवर धरीत होते.

" ——— "

" वय काय आपलं ? "

" पस्तीस. "

" लग्न ? "

" नाही. "

" तुम्ही सुंदर दिसता, सदृढ आहात. का नाही लग्न केलंत तुम्ही ? "

माधवरावांनी पुस्तक बंद केलं. 'ऑब्जेक्टेड टू अॅज इर् रिलीव्हंट अॅन्ड इन कॉंपिटंट अॅन्ड—' पुस्तक पुनः उघडून त्यांनी पुढची ओळ वाचली.

बरोबर! त्यांचा अंदाज बरोबर होता. कुणी लग्न का केलं नाही याची लोकांना काय काळजी? स्वतःपुरती काळजी न ठेवता जगाची काळजी करणाऱ्यांना म्हणावं तरी काय? वेळेवर ऑब्जे-क्शन घेणारा पेरी नेहमीच यशस्वी होतो.

तारेचा कागद खुणेसाठी पुस्तकात ठेवून ते उठले. बैठकीच्या खोलीत कॉफीचे घुटके घेता घेता तार पुन: एकदा वाचली. पुण्याहून तार केली सुमित्रेने, म्हणजे ती अजून पुण्यातच आहे म्हणायची! 'हा आनंदाचा दिवस वारंवार येवो.' कशाला? काही नाही बिघडत, पुन: नाही आला तरी. हा आजचा शेवटचा ठरला तरी चालेल. नव्हे तसा ठरावाच. मला कॅलेंडर बघता येतं. मला आज पंचेचाळीसावं वर्षं लागलं हे मला ठाऊक आहे अन अजू-नही मी अविवाहित आहे हेही ठाऊक आहे. ह्या सगळ्यांची सुमित्रेनं आठवण करून द्यायची आवश्यकता नव्हती. हा



सगळा कुजकेपणा आहे. मानभावीपणा आहे.

माधवरावांनी पत्र लिहायला घेतलं. 'तुझी तार मिळाली. अत्यंत आभारी आहे. तुझा वाढदिवस कधी आहे ते कळव म्हणजे मीही माझ्या शुभेच्छा व्यक्त करू शकेन. तू चाळीशी कधी ओलांडतेस याची वाटच बघतोय. आता या वयात एकलेपणाची जाणीव फारच त्रासदायक असेल नाही ?'

पत्र पुन: वाचताना विचार आला, नको. इतकं तिखट लिहायला नको होतं. पण जाऊदे ! तिनं मुद्दाम तार करून खिजवलंय तेव्हा माझा नाइलाज आहे. पुन: विचार बदलण्यापूर्वी पत्रं पोस्टात पडलेलं बरं !

पुन: आपली भेट होईल तेव्हा इकडच्या तिकडच्या गप्पा न मारता ती सरळ पत्राचा विषय काढील. वयाची जाणीव करून दिल्याबद्दल नावं ठेवील. आरोप–प्रत्यारोप होतील. 'नाहीतरी नकोच ती गुलामगिरी, जेवढं असेल तेवढं आयुष्य स्वातंत्र्यात काढीन' असं म्हणेल 'अन् नशीबात असेल तर मिळेलही अजून कुणीतरी.'

वेडी आशा आहे झालं ! हे काय वय आहे तिचं, तिला कुणी भेटण्याचं ? पण काय सांगावं तो चित्रे तिला भेटलासुद्धा असेल. सुमित्रेचं त्याच्याशी पटेल ! पन्नाशीच्या जवळपास पोहोचलेला मोठ्या पगाराचा हुद्देदार म्हणे ! पैशाचं दडपण कुणावर आणतोस ? माझ्यावर ? ' माधवरावांनी घड्याळाचा सोन्याचा पट्टा उगाचच सारखा केला अन् नकळतच गणपतला हाक मारली. तो जेव्हा आत आला तेव्हा ते गोंधळले.

"काय पाहिजे साहेब ? "

"काही नाही, काही नाही." आजूबाजूला बघत त्यांनी चूक सुधारायचा प्रयत्न केला अन् पत्र त्याच्या हातांत देत ते म्हणाले, "एवढं टाक पोस्टात जाऊन लवकरात लवकर."

"हं ! तर काय बऽऽरं 'पन्ना'शीच्या जवळ पोहोचलेला – आज सोमवार नाही का, म्हणजे उद्या सुमित्रा त्याला भेटेल. तो आपल्या रुबाबदार कपड्यांनी तिच्यावर छाप टाकायचा प्रयत्न करील. काय बघेल तिच्यात तो ? रूप ? वय ? शिक्षण ? अगदी विचित्र वधुपरीक्षा असेल ती. त्याला दोन मुलगे आहेत. मोठे शिकले सवरलेले. कमवते. जाहिरातीत तसं स्पष्ट लिहिलेलंच आहे की कदाचित त्यांच्यापैकीच एकजण सुमित्रेला घरी घेऊन जाण्यासाठी स्टेशनवर येईल. त्या म्हाताऱ्याच्यानं चालवत तरी असेल का ? अन त्यानं नुसत्या पत्रावरच सुमित्रेचीच गाठ घ्यायचं कसं ठरवलं ? तसं कुणी सांगितलंय ? मग काय मुलाखत घेणार आहे नोकरीच्या उमेदवारांसारखी ? काय समजतो तरी काय स्वत:ला तो चित्रे–"

आता या वयात लग्न ? कदाचित खोटंही असेल. आपल्याला डिवचण्याचा तिचा हा आणखी एक प्रयत्न असेल. पण नाही. हे खोटं नाही. जाहिरात आपण स्वत: वाचलेली आहे.

सुमित्रेनं लिहिलेलं पत्रसुद्धा वाचून दाखवलंय. वाचता वाचता वाटलं होतं द्यावं ते फाडून अन् म्हणावं 'सुमित्रा कशाला या फंदात पडतेस ? आपण– आपण म्हणजे तू, आहेस तशी सुखी आहेसच की – '

"आपण कुठं सुखी आहोत ? मी तर नाही. तुम्ही असाल असले तर. मला अजून पुष्कळ जगायचंय. एकटचा जीवनाचा कंटाळा आलाय." तेवढचात तिचा कंठ दाटून आला.

आपली सुखदु:खं चारचौघांत सांगायचा माधवरावांना राग येतो. स्वत:पुरती ठेवा की सुखं की दु:खं. ऐकणाऱ्याला त्याच्याशी समरस होता येत नाही. पण तसं सोंग मात्र आणावं लागतं.

सुमित्रेला नोकरीवर ठेवताना ती अशी असेल याची कल्पना नव्हती नि इतक्या जवळ येईल, जिव्हाळा, आपुलकी दाखवील, एवढचा तेवढचा गोष्टींची काळजी घेईल, अन् आपल्या सुखदु:खांचं असं प्रदर्शन करील याची एवढीशी तरी कल्पना असती तर–

माधवराव कामात स्वत:ला पूर्णपणे विसरले होते. अन् दारावर टक्टक् झाली. त्यांनी वर न बघताच विचारलं, "कोण आहे ? या आत."

"तुम्हांला कोणा साहाय्यकाची आवश्यकता होती ना म्हणून मुलाखतीला आल्ये."

"कोण ? तुम्ही ?" हातातलं काम बाजूला सारीत ते म्हणाले.

"हो ! मी सुमित्रा वर्दे. तुम्हांला कुणी असिस्टंट पाहिजे होता ?"

"पाहिजे होता पण स्त्रियांनी चौकशी करू नये म्हणून स्पष्ट लिहिलेलं होतं जाहिरातीत–– "

सुमित्रा गोंधळून गेली. "पण मला वाटलं – "

आवाज मात्र गोड आहे. तिशी-पस्तिशीची असेल. मधोमध पाडलेल्या भांगाजवळ केस थोडे विरळ झालेले, रंग गोरा. चांगलाच गोरा. माधवरावांना काही बोलताच येईना–"त्याचं असं आहे, हा कारखाना म्हणजे माझा एकपात्री प्रयोग आहे. ऑफिस वर्कबरोबरच प्रत्यक्ष कामात मदत करणारा कुणी मिळाला तर हवा होता.

"अन् दुसरी गोष्ट अशी की, स्त्रियांना कामाला ठेवायचं म्हणजे त्यांचे नेहमीचे उशीर, नैमित्तिक सुटचा वगैरे आम्हांला परवडण्यासारखं नाही." माधवराव बोलतच राहिले. ती ऐकतच राहिली. काही समजलं असल्याचा होकार नाही, पटत नसल्याचा नकार नाही. चित्रातल्या नदीसारखी शांत ! स्तब्ध !!

"कामाची फारच जरूरी असेल तर तुमच्या मुलीला, मुलाला पाठवून द्या. बघतो काही करता आलं तर."

"मुलीला नको. नोकरी मलाच हवीय. मी एकटी आहे. अविवाहित आहे. माझा तुम्हांला अजिबात त्रास होणार नाही."

मग माधवरावांना त्या अस्खलित सुस्पष्ट शब्दांना नकार देववेना.

अन् तिथेच चुकलो. कधी नव्हे तो

स्त्रीच्या मोहजालात फसलो. तिचा निरागस अधोमुख चेहरा हा एक नाटकाचाच भाग आहे हे कळलं, पण फार उशिरा. पहिल्या भेटीत वरसुद्धा न बघणारी सुमित्रा पुढे पुढे प्रसंगी डोळे-सुद्धा वटारायला लागली. पण असं झालंच कसं? मी तिला सल्ला विचारावा इतका तिच्या ताब्यात मी गेलोच कसा? हे असं व्हायला नको म्हणून लग्न केलं नाही — म्हणून लग्न केलं नाही? खरं का हे?

लग्नाबद्दल त्यांच्याशी बोलायची कुणाची प्राज्ञा होती. ते जवळपास असताना चुकून जरी विषय निघाला तरी बोलणारे चरकून जीभ चावत किंवा अनवधानाने माधवराव त्यात सामील झाले तर लक्षात येताच चोरासारखे हळूच निघून जात. पण सुमित्रेची गोष्टच वेगळी. एके दिवशी दुपारच्या चहाच्या वेळेस तिनं सहज विचारलं, " तुमचं लग्न कधीच झालं नाही? "

" अं! " माधवरावांच्या भुवया उंचावल्या. नाही झालं खरं. पण हिला सांगून काय करायचंय? अन् विचारणारी ही कोण? पहिल्या दिवशीची सशाची नजर ती ही नव्हे. " चला जाऊया. " म्हणत त्यांनी वर्कशॉपला कुलूप लावलं. सुमित्रेशी ते जरी बोलले नाहीत तरी मनापासून त्यांना बरं वाटलं होतं. गेल्या अनेक वर्षांत त्यांना अशा आपुलकीनं कोणीही, कधीही, काहीही विचारलेलं नव्हतं अर्थातच! तिला जर आपुलकी वाटत नसती तर तिनं हे, हे असं विचारलंच नसतं. खर म्हणजे अशा गोष्टी विचारायच्या नसतात. आजूबाजूला चौकशी करून, कधी नुसतं ऐकून, समजून घ्यायच्या असतात. समजल्या तरी उच्चारायच्या नसतात. सुमित्रेच्या विचारण्यात बोचण्यासारखं, दुखरं खुपरं काय होतं?

" सुमित्रा चांगली आहे, तुला पाहिजे तशा बौद्धिक पातळीची आहे, समंजस आहे, आकर्षक आहे. म्हण, हो म्हण. आत्ता. आत्ता या घटकेला. उद्या कदाचित उशीर झालेला असेल. जास्त ताणून धरू नकोस. तुझ्या हेकेखोर स्वभावाचा तिला कदाचित तिटकारा येईल. तीच तुला नकार देईल. " माधवरावांचं मन विचलित झालं. तसं व्हायला नको होतं. " काय बिघडलं तसा विचार मनात आला तर? " त्यांनी घरी जाऊन थंड पाण्यानं आंघोळ केली अन् रहस्यकथेत डोकं घातलं.

"डेला, एक काम करशील माझं?"

" येस. बॉस. "

" माझी बायको हो. "

" किती वेळ? " मिस्किलपणानं हसत डेला विचारते.

" हे असंच. दहा वाजेपर्यंत. मागाहून तू घरी जाऊ शकतेस. "

पुस्तक आपोआप मिटलं गेलं. पेरी अन् डेलाचा जोडा फारच सुंदर शोभतो. त्यांचं लग्न झालंच पाहिजे.

" सुमित्रा, माझं एक काम करशील? "

" येस बॉस. "

" माझी बायको हो. "

" खरंच ?" अन् तिचे डोळे लुकलुकले. पण स्वतः असं प्रत्यक्षात विचारायचं धाडस माधवरावांना झालंच नाही. सुमित्रेसाठीच आपण इतके दिवस थांबलो, असं त्यांना वाटायला लागलं होतं. आपण सरळ सरळ विचारायला काहीच हरकत नाही. तिची तयारी आहे. मागं राहतोच ते आपणच. तिनं विचारलं आहेच की, तुमचं लग्न कधीच झालं नाही ? यापेक्षा आणखी किती स्पष्ट बोलणार ?

तिनं कधीच स्पष्ट विचारलं नाही म्हणूनच माधवराव गुरफटले. दिवसेंदिवस कळत नकळत निरखून पाहू लागले. 'कसा शांत चेहरा, विचारवंत डोळे, बोलण्यात अदब, शिक्षण, अनुरूप वय— आणखी काय पाहिजे तुला ?'

काहीतरी खास पाहिजे म्हणून तर माधवराव आतापर्यंत असे एकटे राहिलेत. वीस वर्षांपूर्वी व्यवस्थित मुली पाहायला सुरुवात झाली होती. सुंदर सुंदर मुली माधवरावांना देण्यासाठी सधन पिते पाठीमागे लागले होते. त्यांची आई सुनमुख पाहायची आतुरतेने वाट पाहत होती. दागदागिन तयार होते. माधवच्या होकाराचाच तेवढा उशीर होता. पण तो होकार कधी आलाच नाही. त्या वेड्या आशेतच आईनं राम म्हटला. मागाहून वडीलही गेले अन् मग माधवला आग्रह करणारं कुणीच उरलं नाही. जवळच्यांनी दोन-तीन वेळा प्रयत्न करून नाद सोडून दिला.

" पण का ? का राहिलो आपण अविवाहित ? " प्रथम अप्सरा पाहिजे होती ना !' ती काही मिळाली नाही. प्रत्येक दिवसागणिक सौंदर्याच्या कल्पना बदलत गेल्या. मनाच्या सौंदर्यावर भाळायचं ठरवलं तेव्हा बौद्धिक समतोलानं डोकं पछाडलं. एक भेटली. अगदी पाहिजे तशी. पण तेव्हा माधव तिशीत अन् ती शोडषा. वयांतलं अंतर मनाला डाचत होतं. त्या डाचणीत दिवस गेले अन् दिवसेंदिवस वयांतली अंतरं वाढतच चालली.

तसं पाहिलं तर शोभनामध्ये काय कमी होतं ? जोडीला जोड जमली असती. किचकट गणित सहज सुटत जावं तसं जमत आलं होतं. एकमेकांसमोर बसून मुली तुझं नाव काय ? वाचता येतं का ? चालून दाखव, अशा तमाशाचा नवरदेवाला राग आहे हे जेव्हा तिच्या वडिलांना समजलं तेव्हा त्यांनी सहज सहज गप्पा-गप्पांतून डाव टाकला. माधवरावांना घरी बोलावलं. शोभनेशी ओळख करून दिली. दोघांच्या आवडी निवडी जुळल्या,— विशीतला किंचित पोरकटपणा, थोडासा सभ्यपणा, थोडीशी मोठेपणाची जाणीव, शिक्षण, रंग, रूप, सगळं कसं अनुरूप होतं. पण 'लग्न ठरलं' असं म्हणायचीही कुणाची छाती नव्हती. कारण तेवढ्यानंदेखील नवीन मतांचा नवरदेव बिथरला असता.

" लग्न कधी ठरतं का ? " असे विचार कधीकाळी बोलून दाखवल्याचं

माधवरावांना वाईट वाटत होतं. वाटत होतं की तिच्या वडिलांनी विचारावं–, पसंत आहे का मुलगी म्हणून, लग्न कधी करताय ? मुहूर्त कधीचा धरायचा असं विचारावं असं वाटत होतं पुष्कळ, पण काय उपयोग ? शेवटी माधव स्पष्ट म्हणाला, " मला शोभनाशी लग्न करायचंय, " तेव्हा तिचे वडील नुसते हसले.

संध्याकाळी शोभनेबरोबर बाहेर पडल्यावर खूप बोलायचं ठरवलं होतं त्यांनी, पण मनासारखे शब्द जुळत नव्हते. व्यायाम म्हणून फिरायला गेल्यासारखा शांत वेळ चालला होता. बोलायची तयारीच नव्हती. परतण्या-पूर्वी त्यांनी अडखळत विचारलं,

"—पण तुम्हांला हे पसंत आहे ना शोमना ? "

" माझं पूर्वी कुणावर प्रेम होतं का असं नाही विचारलंत तुम्ही ? " पटकन फुगा फुटावा तशी शांतता भंगली.

संशयानं डंख केला. ताबा ठेवणं अशक्य झालं. " नाही विचारलं. का ? "

" नाही उगचच. तशी फॅशन आहे ना हल्ली ? "

"—"

" पुरुषांना वाटतं प्रत्येक मुलीच्या लग्नापूर्वीच्या काही ना काही भान-गडी असतात. नसल्या तर बरंच. अस-ल्याच तर 'काही हरकत नाही. मी सगळं विसरून जाईन' असं म्हणून फुकटचा मनाच्या मोठेपणाचा आव आणायचा, गोड-गोड बोलून सगळं काढून घ्यायचं अन मग नकार देऊन तिची जगभर नालस्ती करायला मोकळे ! या सगळ्याचा मला राग आहे. शिवाय विचारायचं 'मी तुला पसंत आहे का ?' मला तर वाटतं अशा वरच्या पसंतीला किंमत नसते. लग्न झाल्यावर आपोआप जुळतं— "

" बरं. बरं. एकटी जाऊ शकशील ना घरी ? " असं म्हणून त्यांनी तिला रस्त्यातच सोडलं. डोकं चढलं. ही–ती अशी फटकळ तोंडाची, स्वतंत्र विचा-रांची बायको नको. आपण जे करू त्याचं कौतुक करणारी, 'हां' ला 'हां' किंवा 'मला नाही बाई त्यातलं काही समजत' असं म्हणणारी बायको हवी होती.

पुरुषत्वाचा अभिमान दुखावला होता. शोमनेला दिलेल्या नकारामुळे बदनामी मात्र झाली. कट केल्यासारखं वधूपित्यांनी माधवरावांचं नाव यादी-तून गाळून टाकलं. अनेक पसंत पड-लेल्या मुली मनातल्या मनातच राहिल्या. उघड बोलून दाखवायचं झालं नाही, वय वाढत गेलं, चांगल्या बायकोबद्दलच्या कल्पना बदलत गेल्या, जुन्या कल्पनांतला फोलपणा जाणवत गेला. पण पुष्कळ उशीर झाला होता. खूपच उशीर झाला होता.

शेजारची पुष्पा जवळ जवळ त्यांच्याच वयाची. का कोण जाणे, पण तीसुद्धा अविवाहितच राहिली. नेहमी विचारायची " काय माधव ? कधी ?"

" माझं राहूदे. तुझं कधी ? "

"आम्ही काय वठलो आता. बाजारभाव उतरला."

"मी पण नाद सोडून दिला. तिशी तर उलटली."

"तुम्हां पुरुषांचं वय कधीच ओलांडत नाही. हव्या तेवढ्या मुली मिळतील."

अन् अचानक एक दिवस डोक्यात प्रकाश पडला 'हव्या तेवढ्या मुली मिळतील' स्वत:बद्दल म्हणत नसेल! चालेल!! लहानपणापासून आपण एकत्र आहोत. दोघांचाही स्वभाव एकमेकांना चांगला ठाऊक आहे. आपलं चांगलं जमेल. विचारू या. इतके दिवस कसं लक्षात नाही आलं?"

पण कुणाशी चांगलं जमेल असं कुणीतरी मिळण्यासाठी म्हणूनच का आपण थांबलो होतो इतके दिवस? ते एक ढोंग आहे. अशी मनाची फसवणूक करून लग्न करायचा विचारच नको. जन्मभर ते सलत राहील. शिवाय जग कुजबुजेल 'दोघेही लग्नाची वाढलेली, शेजारी शेजारी राहणारी, अहो, दुसरा काही इलाजच नव्हता तेव्हा लग्न केलं म्हणे त्यांनी. नाहीतर यापूर्वीच नसतं केलं?'

त्या काळी पुष्पाशी लग्न झालं असतं तर–तर आज शेजारच्या पोरीबाळींनी 'काकू कुठायत' विचारल्यावर हसून वेळ मारायची पाळी आली नसती.

लोक हसतात. उगाचच. तेव्हा लग्न करीत नव्हतो म्हणून हसले. आता करतो म्हटलं तरी हसतील. नकोच ते लग्न. आणि आता केवढं असं आयुष्य राहिलंय? पण तसंही नको. अविवाहित मेलो तरीही लोक नाही नाही ते बोलतील. या लोकांची तऱ्हाच विचित्र आहे. सुमित्रा तुला आवडते अन तिला तू. देवानं दिलेली ही शेवटची संधी असेल कदाचित. कसलीही भीड न बाळगता तिला सरळ मागणी घाल.

पण नकोच ते. जगासाठी म्हणून लग्न करायला नको. आता या वयातल्या लग्नाला काही अर्थ आहे? लग्नाचा खेळ होईल. पस्तीशीची वधू उंवरठ्यावरचं माप लवंडून येताना एवढासासुद्धा अश्रू ढाळणार नाही. उलट म्हणेल, 'माधव हे काय वय आहे आपलं? मला नाही वाटत आमचं जमेल असं.'

कारखान्याची वाढ करण्यासाठी, पिढीजात घर विकण्यासाठी म्हणून माधवराव गावी आलेत. हे घर इथं असं झडत पडत राहण्यापेक्षा येईल ती किंमत वसूल करण्यासाठी. वडिलांचं ह्या वस्तूवर किती प्रेम! शहरातल्या सगळ्या सुखसोयी सोडून इथं येऊन राहिले होते. हे असं घर विकून टाकणं त्यांना आवडेल?

खरंच! काय करायचं आहे कारखाना वाढवून? कुणाच्या पोटापाण्याची व्यवस्था करून ठेवायची आहे म्हटलं तर तसंही नाही. सड्या फटिंगाला असं काय लागायचं? आहे ते जन्मभर बसून खाल्लं तरीही पुरून उरेल. अन नावासाठी काही करावं म्हटलं तर नावात काय आहे? दोनचार पिढ्यांना आपली आठवण

राहील. फार तर पाच, सहा, दोनशे वर्षे, तीनशे वर्षे, पुढे ? पुढे काय ? ? अनंतकाळ कीर्तिरूपानं जिवंत राहण्यासारखं थोडकंच आपल्या हातून काही घडणार आहे ?

ठरलं ! घराच्या विक्रीची कागदपत्रं रद्द करून टाकू. कारखाना विकून टाकून उरलं सुरलं आयुष्य इथंच या जन्मभूमीत घालवू. कोणी ओळखीचं भेटायला नको. जुन्या आठवणी उकरून काढणाऱ्या, अस्वस्थ करणाऱ्या, शोभना, पुष्पा, सुमित्रा नकोत. सगळं कसं शांत ! शांत ! !

शांततेचा भंग करणाऱ्या पिंपळाच्या सळसळीनं माधवराव भानावर आले. हाच तो पिंपळ ! लहानपणी रात्रीच्या वेळी या खालून जाताना किती घाबरायचो आपण ! लखूनानाच्या कमळीनं लग्न होत नाही म्हणून म्हाताऱ्याचा त्रास वाचवण्यासाठी विहिरीत जीव दिला तिचं भूत इथं राहतं असं म्हणायचे लोक.

"घाबरू नकोस कमळे. मीही मेल्यावर याच पारावर समंध बनून येईन. मग आपण लग्न करू."

एवढ्यात लांबवर कुठंतरी घुबड घुत्कारलं. छातीतून थंड कळ चरत गेली. 'कमळी हसली तर नाही !'

छे: ! फारच उशीर झाला. पुष्पाला ताबडतोब परतायला हवं. सुमित्रा वाट पाहत असेल--

●


# 'माणूस'

साप्ताहिकासाठी खालील गावी एजंटस् नेमणे आहेत.

चौकशी करावी.

१. पाचोरे, भुसावळ (जि. जळगाव)

२. नंदुरबार व धुळे (जि. धुळे)

३. शेवगाव (जि. अहमदनगर)

# भावडेपणाने केलेली साहित्यसेवा

श्री. पै (रायकर) यांनी मनापासून साहित्यसेवा करण्यासाठी लिहिलेल्या कथांचा हा दुसरा संग्रह आहे. लेखकाची साहित्यनिष्ठा, लेखनाची आवड आणि तन्मयता सर्वत्र दिसते. पण कथा म्हणून प्रस्तुत कथांचा दर्जा दुय्यमच मानावा लागेल. लेखकाची भाषा चटकदार आहे, सोपी आहे, आकर्षक आहे. – जीवनातले काही महत्त्वाचे अनुभव कथेला विषय म्हणून घेतलेले आहेत, पण त्यांत नेमकेपण नाही. पाल्हाळ आहे. विस्कळितपणा आहे. परिणामकारकतेचा एक घटक बांधेसूद रेखीवपणा हा असतो हे बऱ्याच वेळा वर्णनांच्या ओघात लेखक विसरून जातो. 'ज्वालामुखी 'खेरीज कोणतीही गोष्ट एकदम गाभ्याला हात घालत नाही. उगाचच पूर्वपीठिकेमध्ये आणि वातावरणनिर्मितीच्या प्रयत्नांमध्ये रेंगाळते. अशी मुद्दाम ठरवून केलेली 'वातावरणनिर्मिती' सर्व कथांमधून दिसते. मनातल्या भावना आणि लगेच त्याला सदृश निसर्गवर्णन अशी अट्टाहासपूर्वक रचना सगळीकडेच साधलेली आहे. बरे, या मनातल्या भावना तरी काही विशेष उत्कट स्वरूपात अवतार घेतात असेही नाही. अनुभूतीसिद्ध आकृतींची पातळी तर त्या कुठेच गाठू शकत नाहीत. प्रत्येक गोष्टीत दिसते ते लेखकाने भावडेपणाने केलेले पात्रांच्या भावनांचे सोपे नि तरल विश्लेषण. निरनिराळ्या व्यक्ती बोलत असता, कथा-निवेदन करीत असता, त्या साऱ्या व्यक्ती केवळ प्रस्तावनेपुरत्याच राहतात. लेखकच पुढे सरून त्यांच्या मुखातून बोलू लागतो. " आणि ते मानसशास्त्रीयदृष्टचा खरंच नव्हे का ? शालीनता असलेल्या कुरूप स्त्रीचाही मोह एखादे वेळी पुरुषी मनाला पडू शकतो, पण आपणहून सुंदर पुरंध्रीही गळी पडू लागली तरी ती नकोशी होते !" यां-सारखी 'मानसशास्त्रीयदृष्टचा' विश्लेषण करणारी वाक्ये सर्वत्र आढळतात. गोष्ट 'पूर्ण' झालीच पाहिजे, असा आग्रह धरण्याचेही वास्तविक काही कारण नाही. 'विस्तवाशी खेळ' या कथेचा शेवटचा अपघात वगळला असता तर ती जास्त लक्षात राहिली असती. 'देव वसतीला आले' ही गोष्ट त्यातल्या भावनोत्कटतेमुळे नि 'ज्वालामुखी' ही त्यातल्या रसरशीत जिवंतपणामुळे मनाची पकड घेते. बाकी यथातथाच.

— *निशिकांत मिरजकर.*

['सप्तस्वर'– व्यं. अ. पै (रायकर): चार रुपये
प्रकाशिका– सौ. सीताबाई पै (रायकर) : पृष्ठे १६०]



एक नाविन्यपूर्ण आत्मकथा

# सांगत्ये ऐका

## हंसा वाडकर

लेखांक दुसरा

## : १ :

'प्रभात' सोडल्यावर मी मुंबईच्या 'नॅशनल स्टुडिओ'शी करार केला. 'नॅशनल स्टुडिओ'चं 'अपना पराया'चं शुटिंग संपलं तेव्हा मला तिसरा महिना लागला होता. नंतर 'मेरे-गाव'चं शुटिंग सुरू झालं.

प्रभात – बॉंबे टॉकीजमधल्या मुली जशा माझ्यावर प्रेम करीत तशाच 'नॅशनल स्टुडिओ'तल्या मुलीदेखील. मी गरोदर आहे असं समजताच त्या मला जपू लागल्या.

'मेरे गाव'चं शुटिंग चालू असतानाचा प्रसंग. मी खाली पडलेली असते, दुरून एक घोडेस्वार दौडत येतो आणि घोड्याचा एक पाय माझ्या पाठीवर पडतो असा सीन होता. मी गरोदर होते हे सर्वांना माहीत होतं. त्यामुळं उगाच काही बरंवाईट होऊ नये म्हणून घोडा दौडत माझ्याजवळ आल्यावर त्याचा लगाम खेचून पाय वर ओढायचा आणि एथपर्यंतच शॉट घ्यायचा असं ठरलं होतं.

त्याप्रमाणे मी खाली पडले. दुरून घोडा दौडत येण्याचं चित्रीकरण झालं. आता माझ्या पाठीवर त्याची टाप बसल्याचा शॉट होता. सर्वांना भीती वाटत होती की ऐन वेळेवर घोडा आवरेल की नाही. आणि शेवटी तसंच झालं. लगाम खेचला गेला. खिकाळून घोड्यानं पाय वर उचलले आणि ते मागे वळवण्याऐवजी सरळ माझ्या पाठीवर आणले.

पण माझ्याभोवती मुद्दाम चार-पाच मुली उभ्या होत्या. त्यांमध्ये 'पॅरामाऊंट' पिक्चर्समध्ये हिरॉईनची कामं करणारी सुप्रसिद्ध नटी मोतीबाई हीही होती. तीही माझ्यावर फार प्रेम करायची.

घोडा आवरला जात नाही असं पाहताच ऐन वेळी त्या सगळ्या मुली माझ्या अंगावर ओणव्या झाल्या. घोड्याची टाप दुसऱ्याच कोणत्यातरी मुलीच्या पाठीवर बसली. मी मात्र सुखरूप होते. त्या मुलींचं प्रेम आठवलं की अजून डोळ्यांना पाणी येतं.

'मेरे गाव'चं शुटिंग संपलं तेव्हा मला आठवा महिना लागला होता. घरी आले. शिरोडकरांच्या हॉपिस्टलमध्ये मुलगी जन्मली. वाचलेलं हे माझं पहिलं मूल. मला खूप आनंद झाला, पण सर्वांना मुलगा हवा होता. सासूबाईंनासुद्धा. हॉस्पिटलमध्ये मला भेटायला कुणीच आलं नाही. पाचवीला तर कुणी आलं नाहीच पण बारशालाही कुणी आलं नाही.

मला वाईट वाटायचं. मुलगी बघायला, तिचं कौतुक करायला, कुणीतरी यावं असं सारखं वाटायचं. बंदरकर बाहेरगावी गेले होते. माझ्या डोक्यात सारखं हेच की एवढं सोन्यासारखं मूल झालं अन् पाळणा सजवायलादेखील कुणी नाही. डोक्याला त्रास व्हायचा.

हंसा वाडकर – चित्रपट 'रामशास्त्री'



हसून बोल ना। रुसू नको ना।
जाउ नको टाकून। मला रे मनमोहना ॥

ताई–म्हणजे सुशीलाबाई विनायकरावांची पत्नी–कोल्हापूरला होती. नाहीतर ती आली असती. तिचं माझ्यावर खूप प्रेम होतं. शेवटी बायजी आली आणि तिनं थोडंसं केलं.

नाही म्हणायला मेरीबाई मला धीर द्यायला होती. ही मेरीबाई माझी फार लाडकी होती. ती ज्यू होती. 'नॅशनल'मध्ये ती माझ्या मेकअपचं काम करायची. सतत माझी विचारपूस करायची. घरची परिस्थिती तिला सगळी ठाऊक होती. त्यामुळे ती माझ्यावर प्रेम करायची. माझी काळजी घ्यायची. मला मुलांची आवड आहे पण मुलं होत नाहीत हे तिला माहीत होतं. एकदा ती मला म्हणाली, "तुम्ही माऊंट मेरीला नवस करा बाई. म्हणजे नक्की मूल होईल." मी म्हणाले – "तूच करना नवस माझ्यासाठी. मी फेडीन तो. आणि मूल झालंच तर मात्र तुला घरीच घेऊन जाईन."

तिनं नवस केला आणि काही दिवसांनी मला दिवस गेले. पाचव्या महिन्यापासूनच मग मी मेरीबाईला घरी आणून ठेवलं. ती माझी चांगली काळजी घ्यायची. हवं नको ते बघायची. बाळंतपणातही तिनं माझं खूप केलं. कोणतंही काम तिला सांगावं लागत नसे.

माझ्या मुलीचं नाव पुढे आम्ही रेखा ठेवलं. रेखा खूपच मेरीबाईच्या अंगावर होती. इतकी की तिच्याशिवाय राहतच नसे. एकदा रेखा ५–६ महिन्यांची असताना मेरीबाईला कुठल्यातरी उत्सवासाठी घरी जायचं होतं म्हणून रात्रीची सुटी घेऊन ती घरी गेली. रेखा माझ्याजवळ होती. रात्री तिला जाग आली आणि तिनं रडायला सुरुवात केली. नाना प्रकार केले. पण ती रडायची थांबेना. तास झाला, दोन तास झाले तरी तिचं रडणं चालूच. आम्ही घाबरलो. बंदरकरांनी डॉक्टरांना बोलावलं. त्यांनीही प्रयत्न केले. पण रेखा काही रडायची थांबेना. शेवटी बंदरकरांनी गाडी काढली आणि तेवढ्या रात्री आम्ही मेरीबाईचा पत्ता शोधत निघालो. कसाबसा पत्ता सापडला. मेरीबाई बाहेर आली. तिनं मुलीला नुसतं जवळ घेतलं व तिचं रडणं थांबलं. तिच्या घरी उत्सव चालू होता, तरी तिनं घरी सांगितलं, "माझी मुलगी काही माझ्याशिवाय राहत नाही. मी आपली जाते बाई."

मुलगी झाली. मी घरी आले. नंतर वाटलं आपली लाईन सुटली. जरा बरं वाटलं. मला संसाराची आणि मुलांची खूप हौस ना! म्हणून मलाही वाटायचं नकोच ती सिनेमाची लाईन्. ती दगदग आणि ते जीवन.

मूल झाल्यावर काम करायचं नाही असं मी मनाशी पक्कं ठरवलं होतं खरं, पण ते जमलं नाही. दरम्यान घरच्या मंडळींनी 'कादंबरी'साठी कॉन्ट्रॅक्ट करूनही टाकलं होतं. फारच आग्रह पडला म्हणून मी ते काम स्वीकारलं. काम करायला गेले तेव्हा रेखा चाळीस दिवसांची होती.

'कादंबरी'मध्ये माझ्या बरोबरीनं शांता आपटे, हरीश, सुरेंद्र वगैरे काम करीत होते. त्यातल्या एक-दोन सीन्सचं शुटिंग पूर्ण झाल्यावर मी घरी आले तो हे बाहेर-

गावी गेले होते. चौकशी केली तेव्हा कोल्हापूरला गेल्याचं कळलं. बरोबर कुणी मुलगीही होती म्हणे.

मला हे वरं वाटलं नाही. मी खूप चिडले. नाना प्रकारच्या शंकांनी मन बेजार झालं. अस्वस्थ झाले. घरी मोहन होता. त्याला म्हटलं, " मोहन, आपण दूर फिरायला जाऊ समुद्रावर. "

आम्ही दोघं वरळीच्या समुद्रकिनाऱ्यावर आलो. संध्याकाळची वेळ होती. आभाळ भरून आलं होतं. कुणीच कुणाशी बोललं नाही. बराच वेळ बसल्यानंतर एकदम मुसळधार पावसाला सुरुवात झाली. मी खूप भिजले. तसेच आम्ही घरी आलो. घरी आल्यावर पोर्टवाईनची अख्खी बाटली मी संपवली आणि ओकले.

रात्रीतून अंग गरम झालं. मला वाटलं साधा ताप आहे. फार झाल्याशिवाय मी प्रकृतीबद्दल सहसा कुणाला सांगत नाही. दुसरे दिवशी बंदरकर कोल्हापूरहून परत येणार होते म्हणून सकाळी उठून मी त्यांना घेण्यासाठी स्टेशनवर गेले.

बंदरकर गाडीतून उतरले आणि त्यांनी सहज माझ्या अंगाला हात लावला. अंग गरम लागलं. ते म्हणाले, " अगं, तुला चांगलाच ताप आहे. " स्टेशनवरूनच आम्ही परस्पर डॉक्टरकडे गेलो आणि औषध वगैरे घेऊन् घरी आलो.

प्रथम साधा ताप वाटत होता तो टायफॉईडवर गेला आणि एक्केचाळीस दिवस मला अंथरुणाला खिळून राहावं लागलं. माझा भाऊही तापानं फणफणला होता. तो एका खोलीत आणि मी दुसऱ्या खोलीत. मुलीची करणार नाही एवढ्या आस्थेनं सासूबाईंनी या आजारपणात माझी सेवा केली. मी जगते की मरते अशी स्थिती असायची. मी आजारी असताना बंदरकर चोवीस तास घरातच असायचे. पण ते बाहेरच्या खोलीत. आईवडील गावी होते. सुशिलाताई कोल्हापूरहून मुद्दाम माझ्या समाचारासाठी आली.

मी एवढी आजारी होते पण आमच्या धंद्यातल्या लोकांनी काही दखल घेतली नाही. कुणीच भेटायला येत नसे. राजा नेने मात्र एकदा भर पावसात भिजत भिजत घर शोधत आले. आगा तेव्हा माझ्याबरोबर ' मेरे लाल ' या हिंदी चित्रपटात काम करणार होता. तोही अधूनमधून माझ्या समाचारासाठी येई.

मेरीबाई रेखाला घेऊन बाहेर बसलेली असायची. आजारात मी शुद्धीवर आले म्हणजे सतत माझ्याजवळ बसलेले दिसायचे ते सुखटणकर नावाचे एक गृहस्थ. ते बंदरकरांचे मित्र होते. खूप सज्जन होते. कुठे तरी मोठे ऑफिसर आहेत एवढीच मला त्यांच्याविषयी माहिती. ते मला भावासारखे होते. त्यांनी खूप शुश्रूषा केली.

माझ्या आजारात एकदा सासूबाई रेखाला घेऊन बाहेर उभ्या होत्या. कुठल्या-तरी दोन बायका आल्या आणि त्यांनी विचारले, " मुलीची आई आजारी दिसते ! तिला कुणीतरी काहीतरी केलंय. दाखवता का तिला आम्हांला ? "

सासूबाईंनी त्या दोघींना आत आणले. त्या बायांनी माझ्या डोक्यावर लिंबू कापलं, आणखी काहीबाहीसं केलं आणि त्या निघून गेल्या. मी बेशुद्धीतच होते.

तापाच्या एक्केचाळीसाव्या दिवशी मला पलंगावर झोपवेना. जीव कसनुसा व्हायला लागला. त्या दिवशी अमावास्या होती. मी खूप तडफडत होते. म्हणून मला आतल्या खोलीतून समोरच्या हॉलमध्ये आणलं. रात्री बारा वाजता जुलाब झाले.

काही वेळानं मेरीबाईनं माझ्या पलंगावरची उशी उचलली तर त्याखाली काळा कपडा, टाचण्या आणि आणखी असंच काहीबाही तिला दिसलं.

तेवढ्या रात्री ते सामान गोळा करून मेरीबाई समुद्रावर गेली आणि त्या अमंगल वस्तूंचं तिनं विसर्जन केलं.

माझा ताप एकदम खाली आला. एकदम ताप उतरला म्हणून पुन्हा धावपळ सुरू झाली. पुन्हा इंजेक्शन्स द्यावी लागली.

हे सारं मला काहीच कळत नव्हतं. आजारातून उठल्यावर सगळ्या गोष्टी कळल्या.

आजारातून उठले तो खूप अशक्त झाले होते. आजारापूर्वीच 'कादंबरी'चं कॉन्ट्रॅक्ट केलं होतं. पण आजारामुळे ते रद्द झालं. माझी भूमिका वनमालेला देण्यात आली.

आजारातून उठल्यावर लगेच कामं करण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती. तशी ताकदही नव्हती. पण घरच्या मंडळींना पैसा दिसत होता. माझी तब्येत दिसत नव्हती. मी आजारातून उठताच 'प्रभात'च्या एका चित्रपटासाठी माझं कॉन्ट्रॅक्ट करूनही टाकलं. 'रामाचा शेला' हा चित्रपट 'प्रभात'मध्ये घेण्याचं घाटत होतं पण पुढे ती कल्पना रद्द झाली आणि त्याऐवजी 'रामशास्त्री' हा चित्रपट 'प्रभात'नं हाती घेतला. त्यामध्ये मला एका दासीचं काम होतं. तिला काही नृत्यं होती. मला नृत्य जमणार नाही असं सांगून त्यातून अंग काढून घेण्याचा मी प्रयत्न केला. पण जमेल हो जमेल, प्रयत्न केला की सारं जमेल, असा मला आग्रह करण्यात आला.

अखेर 'हो ना' करता करता मी कामाला तयार झाले आणि पुन्हा 'प्रभात'-मध्ये प्रवेश केला. या वेळचा 'प्रभात' आणि 'संत सखू'च्या वेळचा 'प्रभात' यात बराच फरक होता. नवनवीन लोक आले होते. शांतारामबापू 'प्रभात' सोडून गेले होते आणि त्यांनी 'राजकमल' नावाची दुसरीच संस्था स्थापन केली होती. गजानन जागीरदार, विश्राम बेडेकर, ललिताबाई पवार आदी मंडळी आली होती.

'रामशास्त्री'मध्ये मला एक डान्स होता. या वेळेपर्यंत मी चित्रपटात डान्स असा केला नव्हता. म्हणून मला शिकवायला एक डान्समास्तर ठेवला. पंधरा-वीस दिवस मी चांगली मेहनत घेतली. पण जमेना. डान्स अगदी साधा होता. पण तो

डान्समास्तर मोरासारखे हावभाव, हातवारे करून शिकवायचा आणि कत्थक-सारखं नाचायचा. ते काही मला जमेना. शेवटी जागीरदार आणि ललिताबाई यांनी मला जे शिकवलं तेवढयावरच मी तो डान्स केला.

'रामशास्त्री'च्या वेळेस 'प्रभात' मध्ये साहेबमामा (फत्तेलाल) होतेच. चित्रपट अगदी वास्तव असावा याबद्दल त्यांचा किती कटाक्ष होता याची मला चांगलीच आठवण आहे. माझ्याबरोबर 'रामशास्त्री'मध्ये मास्टर विठ्ठल काम करीत होता. 'रामशास्त्री'चं काम स्वत: गजानन जागीरदार करीत होते. चित्रपटाचे दिग्दर्शक जागीरदार आणि बेडेकर दोघेही होते. जागीरदार रंग लावून कामाला बसत तेव्हा बेडेकर दिग्दर्शन करायचे.

मला आणि मास्टर विठ्ठलला पकडून 'रामशास्त्रीं'पुढे आणतात, आम्ही त्यांना नमस्कार करतो आणि मग 'रामशास्त्री' आम्हांला शिक्षा सुनावतात असा मोठा शॉट होता.

त्याप्रमाणे शॉट झाला. साहेबमामा त्यांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे वरच्या एका फळीवरून तो बघत होते. शॉट संपल्यावर साहेबमामा खाली उतरले आणि म्हणाले, "याच शॉटची पुन्हा रिहर्सल घ्या."

सगळे आश्चर्यचकित झाले. काय झालं, काय चुकलं, असं विचारू लागले. कुणाला काहीच कळेना. साहेबमामा म्हणाले, "काय बेडेकर, शॉट ठीक झाला का? जागीरदार तुम्ही रामशास्त्री ना? कसा झाला शॉट?" त्यांच्या विचारण्याचा रोख कुणाला कळेना. काहीतरी चुकलं होतं खास.

शेवटी साहेबमामा म्हणाले, "जागीरदार, तुम्ही त्या दोघांना पायाला हात लावन नमस्कार का करू दिलात? ते दोघे पापी आहेत. रामशास्त्री असा नमस्कार करू देणार नाही. नमस्काराच्या वेळी पाय मागे घ्यायला हवा."

तेवढयासाठी मग तो सबंध शॉट रीटेक करावा लागला. साहेबमामांचं असंच साऱ्या बारीक-सारीक खुब्यांवर लक्ष असतं. ते एवढं बारकाईनं पाहात म्हणूनच ती पिक्चर्स एवढी चांगली निघत.

'रामशास्त्री'च्या वेळेसच प्रथम माझा जागीरदारांशी आणि बेडेकरांशी परिचय झाला. तोपर्यंत मी जागीरदारांना पाहिलंही नव्हतं. 'रामशास्त्री'च्या निमित्ताने माझा जागीरदारांशी आणि ललिताबाई पवारांशी घनिष्ठ संबंध आला. तोपर्यंत मला त्यांच्याविषयी फार आदर आणि उत्सुकता वाटत होती.

एके दिवशी ही सारी मंडळी 'कार्यक्रमा'ला बसली होती. मीही जवळच होते.

"हमारे साथ तुम भी बैठो," जागीरदार म्हणाले.

"आओ–आओ, बैठो." ललिताबाईंनी आग्रह केला.

थोडा वेळ बसल्यावर त्यांनी मला बियर घेण्याचा आग्रह केला. बियर घ्यायला काहीच हरकत नाही, असं सांगितलं.

त्या वेळेपर्यंत मी आयुष्यात फक्त दोनदा की तीनदाच मद्याला स्पर्श केला होता आणि तोही हौसेनं नव्हे तर सगळ्या जगावर सूड घेण्याच्या ईर्ष्येनं. बेभान अवस्थेत, सारासार विचार सुटला असताना रागाने मी प्यायले होते. दुःख, अपमान विसरण्यासाठी. आणि प्यायल्यानंतर पस्तावले होते. केवळ हौसेनं, गंमतीनं असं मद्य मी कधीच घेतलं नव्हतं.

खूपच आग्रह झाला म्हणून मी त्या दिवशी बियर घेतली.

मला सारखं वाटतं, त्या दिवशी मी मन घट्ट ठेवून संयम राखला असता तर ? त्या दिवशी माझा पाय घसरला नसता तर ?—

त्या दिवसापर्यंत माझं आयुष्य कसं निर्मळ होतं. मी स्वच्छ होते, निष्पाप होते. तेथून पुढे सर्व बदलले. आयुष्याला वेगळंच वळण लागलं.

या वेळपर्यंत मी कधी चुकून वाट चुकले होते ती आकसाने, आणि पुन्हा पश्चात्ताप पावून वाटेवर आले होते. त्या बेताल जीवनाची चटक तर मला मुळीच नव्हती. पण या दिवसापासून सारंच बदललं.

प्रथम प्रथम मी कंपनीतच घेत असे. मग वाटू लागलं, बाहेर घेतो आहोत तर घरातही का घेऊ नये ? मग मी घरीच बाटल्या आणून ठेवू लागले. सवय वाढू लागली.

एवढं मात्र मी एक ठरवलं की शुटिंगच्या वेळी काहीही घ्यायचं नाही. कलेशी बेइमान व्हायचं नाही. शेवटपर्यंत मी हे पथ्य पाळलं. सेटवर दुसरं कुणी पिऊन आलेलं असलं की मला तो रंगदेवतेचा अपमान वाटायचा. आर्टिस्टनं रंगदेवतेला मान द्यायलाच हवा. मी आर्टिस्टच्या मर्यादा पाळीतच होते.

याच सुमाराचा 'प्रभात'मधला एक गंमतीदार प्रसंग आठवला की अजून हसू येतं. माझा पाय घसरण्याआधीची गोष्ट. स्टुडिओतली काही मंडळी आणि तंत्रज्ञ भांगेच्या गोळ्या घ्यायचे. आमच्यापासून लपवून ठेवून ते या गोळ्या घ्यायचे. ते काय खातात याचं आम्हांला मोठं कुतूहल होतं. "काय खाल्लं" असं आम्ही विचारलं तर ते सांगत नसत.

एके दिवशी असंच शुटिंग रद्द झालं होतं. मी, ललिताबाई आणि मीनाक्षी उगाच भटकत होतो. मंडळींनी भांग चढवली होती. आम्ही त्या दिवशी हट्टालाच पेटलो होतो. तुम्ही काय खाता ते आम्हांलाही द्या, असा आम्ही खूपच आग्रह धरला. शेवटी मोठ्या प्रयासाने आम्हांलाही त्या गोळ्या मिळाल्या. आणि त्या आम्ही खाल्ल्या.

पंधरा-वीस मिनिटंच झाली असतील. एवढ्यात एकाएकी मला आणि मीनाक्षीला मेकअप करायचा आदेश मिळाला. आमची तारांबळ उडाली ! गरगरू लागलं होतं. मीनाक्षी तिकडे तर मी इकडे. मेकअपमध्ये लक्ष नाही तर शुटिंग जमणार कसं ? भांगेचं प्रकरण बाहेर कुणालाच माहीत नव्हतं. मेकअप करून आम्ही सेटवर आलो.

आणि कानात वारं भरल्यासारखा हुरूप चढला. बेडेकरांनी मला एक ॲक्शन करून दाखवली तर मी तशाच दहा प्रकारच्या विविध छटा असलेल्या ॲक्शन्स करून दाखवत होते. वास्तविक त्या वेळी दिग्दर्शकांचा दरारा केवढा होता. पण त्या गोळीनं आमची भीती-बीती पार उडवून लावली होती. दिवे लागले. कॅमेरा काढला, शुटिंग सुरू झालं, आणि अगदी छान झालं. आज या दोघी इतक्या मूडमध्ये का, याचा कुणालाच अर्थबोध होईना.

शुटिंग संपवून आम्ही सेटबाहेर आलो. ज्यांनी आम्हांला गोळ्या दिल्या होत्या ते हळूच म्हणाले, " झालं ना समाधान ! आता खा काहीतरी न् झोपा. "

घरी आले. सपाटून खाल्लं आणि बसल्याबसल्याच झोपले.

'रामशास्त्री ' पूर्ण झालं तेव्हा रेखा सहा महिन्यांची होती. मुंबईचं आमचं बिऱ्हाड वरळीला आणलं होतं. जागीरदार आमच्या घराच्या वरच राहत होते. त्यांचं-आमचं जाणं-येणं होऊं लागलं. आणि घरात आमची भांडणं वाढू लागली.

आमची भांडणं व्हायला कारणही विशेष लागत नसे. मला रात्री सिनेमा पाहायला आवडायचं तर बंदरकरांना दुपारी. त्यावरूनही आमची भांडणं होत.

कौटुंबिक तेढ वाढत गेली. आणि आम्हां नवरा-बायकोत पडदा निर्माण झाला होता. जुळवून घेण्याचा मी खूप प्रयत्न करीत होते. पण जमत नव्हतं—

रेखा वाढतच होती—

## : २ :

' रामशास्त्री 'चं चित्रीकरण चालू असतानाच ' प्रभात 'मध्ये अंदाधुंदी चालू झाली होती. शांतारामबापू आधीच बाहेर पडले होते. दामलेमामा आजारी होते. इतरत्र लोक घुसत होते. पंजाबी लोक मोठ्या संख्येने घुसत होते.

' रामशास्त्री 'मध्ये मी डान्स करणाऱ्या दासीचं काम केल्याचं आजारी असतानाच दामलेमामांना कळलं होतं. ते म्हणाले, " अरेरे, हिला आपण ' दहा वाजता 'मध्ये काम दिलं नाही. "

शांतारामबापूंनी बाहेर पडल्यावर ' राजकमल 'ची स्थापना केली होतीच. त्यांनी ' आंधळ्याची शाळा ' या नाटकावर चित्रपट काढण्याची तयारी चालवली होती. ' रामशास्त्री ' संपलं तेव्हा अण्णांनी या चित्रपटातील भूमिकेसाठी मला बोलावलं.

' राजकमल 'मध्ये तेव्हा गुरुवर्य बाबूराव पेंटर होते. त्यांनी माझी परीक्षा घेतली. त्यांनी बोलावल्यावर त्यांच्यापुढे मी गेले. बसा म्हटल्यावर बसले. माझी परीक्षा सुरू झाली. " या बाजूला बघा " असं त्यांनी सांगितलं तेव्हा मी त्या बाजूला

घितलं. झालं. परीक्षा संपली. जाण्यापूर्वी मी अगदी खाली वाकून बाबूराव पेंटरन नमस्कार केला. कोणीही मोठा माणूस दिसला की आदरानं त्यांच्या पायाला हात लावून नमस्कार करण्याची लहानपणापासूनची माझी सवय होती.

माझी निवड झाली. जाता जाता माझ्याकडे बघत बाबूराव म्हणाले, "तमाशावर जर आम्ही सिनेमा काढला तर त्यात तुम्ही काम कराल काय ?"

मी म्हणाले, "छे ! छे ! मला ते कसं जमेल ?"

लहानपणी मी तसा तमाशा चोरून पाहिला होता. तमाशाचा सगळा प्रकार माझ्या डोळ्यांसमोर होता. "मी काही तमाशात काम करणार नाही," मी सांगितलं.

एवढ्यावरच प्रकरण थांबलं. 'राजकमल'मध्ये काम करायचं असं सांगून अण्णा अमेरिकेला निघून गेले होते. माझ्यापुढे बिकट प्रश्न होता. तमाशाच्या चित्रपटात काम करायला मन कचरत होतं.

पाच महिन्यांनंतर एकदम अण्णांचं अमेरिकेहून पत्र आलं. शुटिंग कुठपर्यंत आलंय ? अशी त्यांनी विचारणा केली होती. त्याच दिवशी बाबूरावांनी मला हुकूम वजावला, "चला, उद्यापासून शुटिंगला सुरुवात. दोन-तीन गाणी उद्या घेऊन टाकू."

ही सर्व तयारी 'रामजोशी' या चित्रपटाची होती. तोपर्यंत मला त्याची काहीच माहिती नव्हती.

'रामजोशी'मधल्या बयेची प्रमुख भूमिका माझ्यावर सोपवली होती. तमाशातील नृत्याचा मला काहीच सराव नव्हता, अनुभवही नव्हता. तेव्हा तमाशा नृत्याची मला माहिती देण्यासाठी म्हणून त्या वेळी तमाशात गाजत असलेल्या अनसूयाबाई कवठे-करीण या बाईला मला शिकवण्याचं काम दिलं. अनसूयाबाई रोज नियमानं यायची. मला तमाशातील नृत्यांचे पदन्यास करून दाखवायची. पण मला मात्र काहीच जमत नव्हतं. "बाई असं करा" असं ती सांगायची आणि त्याप्रमाणे मी करायची. पण त्यात कोणत्याही प्रकारची कला नव्हती.

दुसऱ्या दिवशी शुटिंग होतं म्हणून आदल्या दिवशी रिहर्सल चालू होती. शेवटची रिहर्सल होती. मला ॲक्शन येत होती, पण नृत्याची पावलं चुकत होती. गाण्याचं पिक्चरायझेशन व्हायला एक आठवडा लागेल, असा अंदाज होता. पण एका दिवसात सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते उरकलं गेलं.

ॲक्शनचा भाग संपला. आता सर्वांत महत्त्वाचा म्हणजे पदन्यासाच्या चित्रीकरणाचा भाग राहिला होता. त्यासाठी बराच प्रयत्न झाला. पण मला पावलं जमेनात. आणि शुटिंगही जमेना. अनसूयाबाई शेजारी पदन्यास करून दाखवायच्या. ते बघूनही जमत नव्हतं. शेवटी त्या अडीचशे लोकांच्या मॉबसमोर चिडीनं बाबूराव ओरडले, "काय बाई, तिला नाचता येतं आणि तुम्हांला नाचता येत नाही." आसपासचे लोक फिदीफिदी हसले. मला चारचौघांत झालेला हा अपमान सहन

झाला नाही. मी पायांतले चाळ काढून ताडकन फेकून दिले आणि तडतडत माझ्या खोलीत गेले व रडू लागले.

'काय झालं, काय झालं,' अशी चौकशी करीत वसंतराव देसाई वगैरे मंडळी आली. एवढ्यात स्वतः बाबूरावही आले. ते म्हणाले, "नाच येत नाही ना? मग शिका. रडायला काय झालं?"

मी म्हणाले–"पण मला शिकायला वेळच कुणी दिला होता?" ते म्हणाले, "असं? किती दिवस लागतील?" मी म्हणाले, "चार दिवस." "ठीक आहे. चार दिवसांनी परत शुटिंग घेऊं," असं म्हणून ते निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळपासून मी, अनसूयाबाई आणि वसंतराव देसाई यांनी एका खोलीत कोंडूनच घेतलं. चाळ, घुंगरू, पेटी आणि तबला. अक्षरशः दिवसरात्र प्रॅक्टिस करत होतो. डोकं गरगरून गेलं. पाय सुजून आले.

चौथा दिवस उजाडला. शुटिंगची तयारी झाली. मी सेटवर आले अन् माझा पाय ठरेना. नृत्यगीताच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली–

**"लाडं लाडं आले मी मोहना–**
**कडेवर घ्याना, अंऽऽ जीऽऽऽ–"**

एका दिवसात शुटिंग कधी संपलं हेही कळलं नाही.

त्यानंतर आऊट डोअर शुटिंगसाठी आम्ही कोल्हापूरला गेलो. ते आटपून आल्यावर अण्णा परदेशातून परत आले होते. लगेच त्यांच्या शिस्तीच्या रगाड्याला सुरुवात झाली. झपाट्यानं कामं उरकू लागली. भराभर रिहर्सल होऊ लागल्या. आणि अण्णांना त्या पसंत पडल्या की त्यांचं शुटिंग होऊ लागलं. सगळं कसं अण्णांनी आखून दिलेल्या वेळापत्रकानुसार होत असे.

'रामजोशी' तील सवाल-जवाबाचा सीनदेखील अण्णांच्या देखरेखीखाली असाच झपाट्यानं पार पडला. जयराम शिलेदार आणि मी या भूमिकेशी अगदी तन्मय झालो होतो.

**"पंचांग सांगता जन्म गमवला, उगाच घालता काय भिती**
**चंद्रकोरीपुढं तुमचा काजवा, लुकलुकणार हा तरी किती"**

माडगूळकरांची बहारीची काव्यरचना आणि वसंतराव देसाई यांचं संगीत यांचा मिलाफ और होता.

'रामजोशी'चं मराठी चित्रीकरण चालू असताना त्याचबरोबर त्याचं हिंदीकरणही 'मतवाला शायर' या नावानं चालू होतं. एक शॉट मराठीचा तर लगेच नंतर संवाद बदलून तोच शॉट हिंदीसाठी घेतला जाई.

हिंदी सिनेमात 'रामजोशी' चं काम शिलेदारांच्या ऐवजी मनमोहन नावाचा नट करायचा. त्याच्या तोंडी 'बया' हा शब्द खूप वेळा होता. पण मला तो हाक

मारताना बकरू ओरडल्या सारखा 'बँ बँ' करायचा आणि ते ऐकले की मी खदखदा हसायची. मी हसले की आण्ण डोळे मोठमोठे करून बघायचे आणि मनमोहनला वाटायचे मी मुद्दामच त्याला 'नर्व्हस' करण्यासाठी हसते आहे. माझ्या जेव्हा हे लक्षात आले तेव्हा त्याला मुद्दाम बाजूला घेऊन मी सांगितलं की गैरसमज करून घेऊ नका. तुमच्या उच्चाराचं मला हसू येतं एवढंच.

'रामजोशी' चित्रपटातील एका दृश्यात मी झोपाळ्यावर असतानाचा एक सीन होता. रामजोशी माझ्याजवळ येऊन माझ्या दंडांना धरतो—असा तो प्रसंग होता. जयराम शिलेदार फारच लाजरे—बुजरे. ते दुरून घाबरत घाबरत माझ्याजवळ यायचे. सीन काही जमेना. अण्णांनी हे पाहिलं. मग ते माझ्याजवळ आले. माझ्या दंडांना त्यांनी हात लावून पाहिला आणि शिलेदारांकडे पाहून ते म्हणाले, " नाही हो ! बाईच्या दंडांना हात लावल्यावर काही शॉक-बिक् बसत नाही." शिलेदार आणखीच नर्व्हस व्हायचे.

याच दृश्याचे हिंदीकरण करताना मनमोहन अगदी विरोधी वागे. तो भलताच उत्साही होता. माझे दंड तो इतके घट्ट पकडून ठेवायचा की मला नकोसं व्हायचं. शेवटी अण्णा म्हणायचे, "बस् मनमोहन, अब बहोत हो गया."

'रामजोशी'च्या गाण्यांना वसंत देसाईंनीच प्लेबॅक द्यावा, अशी पहिली कल्पना होती. देसाईंच्या आवाजाची चाचणी घेऊन पाहिली. पण काही जमेना. आवाज जुळेना. शेवटी जयरामांनीच सर्व गाणी म्हटली. आणि ती पुढे कमालीची गाजली !

'रामजोशी'चं शुटिंग चालू असताना हिंदु-मुसलमानांचा दंगा सुरू झाला होता. संध्याकाळपासून सकाळपर्यंत 'कर्फ्यू' लागू केला होता. आम्हांला कामाची एवढी हौस की आम्ही शुटिंगसाठी दुपारी गेलो की, रात्रभर काम करीत असू. याच सुमारास मेरीबाईनं मला पानतंबाखू खायची सवय लावली होती. सवय एवढी वाढली की कधी कधी तंबाखूचा बार भरल्याशिवाय मूड येत नसे. स्टुडिओत मात्र पंचाईत व्हायची. शांतारामबापूंची अशी आज्ञा होती की स्टुडिओत कुणी पानतंबाखू खाऊन घाण करायची नाही. धूम्रपानही कुणी करीत नसे. केशवराव दात्यांनी प्रत्यक्षपणे मला सांगितले होते की, अण्णांच्यादेखत पानतंबाखू चघळत जाऊ नकोस.

एकदा सेटवर अण्णा रिहर्सल घेत होते. माझा काही मूडच लागेना. शेवटी असह्य होऊन मी अण्णांना म्हणाले, "अण्णा, मी पाच मिनिटांत जाऊन येते." अण्णांनी ओळखलं. ते म्हणाले, " पानच खायचं आहेना. मग मागवा की इथं." मी म्हणाले, "अण्णा, पान खायचं नाही असा नियम आहेना !" अण्णा म्हणाले, " नियम स्टुडिओतील कायम काम करणाऱ्या कलावंतांना आहे, तुम्हांला नाही."

मग त्यांनी स्वतःच पान मागवलं. त्यानंतर मात्र मी 'राजकमल'मध्ये राजरोस पान खाऊ लागले.

'रामजोशी'तलं बयेचं काम म्हणजे मला आव्हान होतं. आतापर्यंत सारी

सोज्वळ कामं केलेली ! वया म्हणजे एक धंदेवाईक तमासगिरीण. ती कशी काय उभी करायची ?

मी अनसूयाबाई कवठेकरणीला डोळ्यांसमोर आदर्श म्हणून ठेवले. तिचे हाव-भाव, नखरे, चालणं-बोलणं सारं पाहून ठेवलं. आणि काम करताना जास्तीत जास्त तिच्यासारखं वागण्याचा प्रयत्न करू लागले. तिची पदर घण्याची आणि उड-विण्याची पद्धत उचलली. तिचा एक मोठा फोटो मी मुद्दाम काढवून घेतला होता. तिच्या भांगाची पद्धत उचलली. तिचे डोळे उडवणं पाहिलं आणि तशीच वया वठवण्याचा प्रयत्न केला.

'रामजोशी'मधील एक प्रसंग मला अजूनही आठवतो. तो मी कधीच विसरणार नाही. अगदी शांत शांत वातावरणात तो प्रसंग चित्रीत करायचा होता. त्यात मी रडणार होते. मी ओणवी होऊन आजारी पडलेली असते. 'रामजोशी' दुरून हळू हळू येतो. त्याच्या हाती औषध असते. ते तो वयेला देतो. ती त्याच्याकडे बघते. म्हणते, "माझ्यामुळं किती त्रास हा." आणि मी एकदम भडभडून रडू लागते. हा प्रसंग.

स्टुडिओतील वातावरण खरोखरच शांत होतं. अगदी शांत. माझ्या त्रेचाळीस वर्षांच्या आयुष्यात एवढी शांतता अजूनही अनुभवली नाही. कॅमेरामन, लाईट लावणारे, इतर तंत्रज्ञ कुण्णी कुण्णी तोंडातून शब्द काढीत नव्हते. चालणाऱ्यांच्या पायांचा जराही आवाज येत नव्हता. लाईटिंग चाललं होतं, तेही खुणांनीच. वातावरण एवढं तयार झालं होतं की मला एकदम भडभडून रडूं येतं की काय असं वाटत होतं. मी खरीच आजारी आहे असं वाटू लागलं. शॉट सुरू झाला. कॅमेरा फिरत फिरत क्लोजअपसाठी माझ्या चेहऱ्यावर आला. आणि इतका वेळ दाबून ठेवलेलं रडू एकदम फुटलं. मी ओक्साबोक्शी रडू लागले. अर्ध्या मिनिटातच शॉट संपला.

त्या वेळी मला काय झालं होतं कुणास ठाऊक. मलाही सांगता येणार नाही. कसलं अनामिक दुःख एकाएकी कुठून बाहेर येत होतं कोण जाणे. पण मी पुढे पंधरा मिनिटं रडतच होते. सारे लोक कमालीच्या आश्चर्यानं माझ्याकडे बघत होते. अण्णा मात्र काहीच बोलले नाहीत. आपल्या खुर्चीजवळ ते शांतपणे उभे होते. सेटवर अण्णांची खुर्ची असायची पण तीवर ते कधीच बसत नसत.

रडणं झाल्यावर मी डोळे पुसले. अण्णा म्हणाले," व्हेरी गुड. बाहेर जाऊन बसा."

मग हिंदी शॉट होता. आता एवढं खरोखरीचं रडल्यावर पुन्हा कसलं मी रडणार? जमेल का ? मला भीती वाटत होती. पण अण्णा खरे कलावंत. कलावंताची जात, मूड सारं त्यांना कळतं. मला रडू येणं शक्य नाही हे त्यांनी ओळखलं, मग त्या शॉटचे दोन कट्स करून माझ्या डोळ्यांत ग्लिसरीन टाकून मगच त्यांनी रडण्याचा शॉट घेतला.

अण्णा अमेरिकेहून परतण्यापूर्वी 'रामजोशी'मधील बऱ्याच प्रसंगांचं चित्रीकरण

बाबूराव पेंटर यांच्या दिग्दर्शनाखाली झालं. म्हाताऱ्या बाबूरावांचा माझ्यावर बराच जीव होता. 'रामजोशी'चं 'आऊट डोअर' शुटिंग होतं. मी गळयाइतक्या पाण्यात प्रवेश करायचा असा तो प्रसंग होता. मला तेव्हा पाण्यात जायचं नव्हतं. मी बाबूरावांना सांगितलं, "बाबूराव, आज पाण्यात जायचा सीन घेऊ नका. मला पाण्यात जायचं नाही." ते समजले.

म्हणाले, "बरं नाही घेणार. नंतर कधीतरी घेऊ."

पण वार्धक्यामुळं बाबूराव सांगितलेल्या गोष्टी लवकर विसरून जात.

शुटिंग सुरू झालं आणि बाबूराव म्हणाले, "हंसा, चल, हो पाण्यात."

आजूबाजूला सर्व मंडळी उभी होती, सगळयांसमोर सांगण्याची मला लाज वाटत होती. बाबूरावांकडे एकदा पाहिलं नि शेवटी गेले पाण्यात. गुडघ्यापर्यंत पाणी आलं. तेव्हा थबकले. बाबूराव म्हणाले, "आणखी पुढं हो. आणखी पुढं हो." असह्य होतं होतं. तरीही पुढं गेले. पाण्यात डुबकी मारली. जयराम शिलेदारांनी पाण्यात उडी मारली. आमचे संवाद झाले. शुटिंग संपलं.

पाण्यातून वर आले, तेव्हा मला बसताही येईना की उठताही येईना. पाय आखडून आले होते. सगळयांसमोर उभं राहण्याची लाज वाटत होती. शेवटी आऊट डोअर शुटिंगचे सर्व लोक निघून गेल्यावर माझ्याबरोबर असलेल्या सुंदराबाईंनी इतर बायांच्या मदतीने माझ्याभोवती एक पातळ तंबूसारखं धरलं, त्यात मी कपडे बदलले.

ते आऊट डोअर शुटिंग पुढं सात-आठ दिवस चालू होतं.

बाबूराव पेंटरांचं माझ्यावर फार प्रेम. नंतर ते गेले, तेव्हा दोन-तीनदा त्यांनी माझी चौकशी केली होती असं कळलं. मला काहीच कल्पना नव्हती. ते गेले तेव्हा फार वाईट वाटलं. त्यांच्याबद्दल मला फार आदर होता. आणि हा आदर इतरांचा रोष पत्करूनही मी त्या वेळी व्यक्त करीत असे.

वास्तविक 'रामजोशी' हा सर्वच गुणांनी श्रेष्ठ असूनही त्याची हिंदी आवृत्ती 'मतवाला शायर' यालाच सिंकोचे पहिले बक्षिस मिळाले. मुंबईला एम्पायर थिएटरात हा बक्षीस समारंभ होता. मोठा समारंभ, गर्दी म्हटली की मी बावरते म्हणून मी म्हटलं, "मी जातच नाही समारंभाला."

पण सर्वांनी आग्रह केला, म्हणून गेले.

घरच्या मंडळींना दूर मागं बसविलं होतं. मी एकटीच समोर बसले होते. माझ्या-समोरून काही माणसं 'हंसाबाई अभी तक नहीं आयी!' असं म्हणत दोन-तीनदा गेली. त्यांनी मला ओळखलंच नाही. मीही अंग चोरूनच खुर्चीवर बसले होते. शेवटी एकानं ओळखलं, चला वर असं म्हणून मला स्टेजवर नेलं.

बॉंबे टॉकीजचे शेषाद्रि, मुबारक, मुकर्जी, मी, आणखी दोघा-तिघांना बक्षिसं मिळाली होती. व्यासपीठावर बडीबडी माणसं होती. त्या वेळचे मुंबईचे मुख्यमंत्री

बाळासाहेब खेर समारंभाचे अध्यक्ष व त्यांच्या पत्नी बक्षिसं वाटणार होत्या.

तुला भाषण करावं लागेल, असं सांगून मुद्दाम रमाकान्त चौधरींनी मला भाषण लिहून दिलं होतं. चौधरी आमच्या शेजारीच वरळीला राहत. त्यांची–आमची चांगली ओळख होती. 'इंपीरीयल पिक्चर्स'चे ते डायरेक्टर होते. त्यांनी लिहून दिलेलं भाषण मी घाईघाईनं पाठ केलं होतं. कागद हाती होताच. प्रत्येकजण बक्षीस घेतल्यावर काही तरी बोलत होता.

कुणीतरी–बहुधा मुबारकच–म्हणालं, "आम्ही आर्टिस्ट लोक, दुसऱ्यांनी लिहून दिलेली भाषणं पाठ करून बोलतो असं लोक म्हणतात. पण ते काही खरं नाही." झालं. ते ऐकून तर मी पार घाबरलेच. सारं भाषण साफ विसरून गेले.

एवढ्यात माझं नाव पुकारलं गेलं. बक्षीस देताना बाळासाहेब खेर मला म्हणाले, "एवढ्या लोकांना बक्षिसं दिली आहेत. पण आम्ही मात्र फक्त तुमचाच चित्रपट पाहिला आहे बरं का!" ते ऐकून मला जरा बरं वाटलं.

लोक ओरडू लागले, "हंसाबाई, काही तरी बोला." पाय लटलटा कापत होते. माईकजवळ गेले, आणि शब्दच फुटेना. लोकांकडे बघून नुसतीच हसले. कुणीतरी कानांत सांगितलं, 'आभार माना, आभार माना.'

म्हणून मी प्रथम बाळासाहेब खेर आणि सौ. खेर यांचे आभार मानले. नंतर आपल्या चित्रपटाचे दिग्दर्शक म्हणून गुरुवर्य बाबूराव पेंटर आणि शांतारामबापूंचे आभार मानले.

बोलताना प्रथम बाबूरावांचं नाव मी घेतलं. शांतारामबापूंकडं पाहिलं तर ते माझ्याकडे मोठाले डोळे करून बघताहेत!

दिग्दर्शनामध्ये बाबूराव पेंटरांचाही हात होता. ते शांतारामबापूंचे गुरू. त्यांचं नाव घेतलं म्हणून शांतारामबापू का रागावले हे मला कळेना. माझ्या डोळ्यांत पाणी आलं. आणि मी हसूही लागले. लोक म्हणाले, "ठीक आहे. बोलत नसाल तर नुसतंच हसा."

अण्णांच्या हाताखाली मी 'रामजोशी' हे एकच पिक्चर केलं. पण ते शेवटपर्यंत मी विसरणार नाही. अण्णांकडे शिकायला भरपूर मिळतं. मी खूप दिग्दर्शक पाहिले. पण अण्णांसारखे अण्णाच. ज्यांना धड संवाद बोलता येत नाहीत, असे दिग्दर्शक पाहिले. एखादा संवाद असा म्हणा, असं दिग्दर्शकानी सांगितलं आणि आर्टिस्टनं विचारलं, "तुम्हीच बोलून दाखवा बघू कसा तो," तर पार गडबडून जाणारे दिग्दर्शक पाहिले. पण अण्णांवर हा प्रसंग कधीच येत नसे.

मला अजूनही अण्णांबद्दल फार आदर आहे. लोक त्यांच्याबद्दल आता नाही नाही ते बोलायला लागले म्हणजे मला चीड येते. त्यांची नवीन पिक्चर्स नसतील चांगली निघत. म्हणून त्यांची जुनी कामगिरी विसरावी की काय?

आर्टिस्ट अण्णांचीच सहीसही नक्कल करू बघतात. आणि इथेच ढासळते.

अण्णांपासून शिकणारीला खूप शिकता येते. फक्त त्यांची नक्कल केली नाही म्हणजे झालं.

अण्णा सेटवर कधीच चिडत नसत. निदान माझ्या पाहण्यात तरी नाही. एकदा सेटवर मी आणि शकुंतला भोमे होतो. कशानं तरी आम्ही उगाचच हसू लागलो. हसू थांबेना.

अण्णांनी विचारलं– "काय झालं हसायला?" आम्ही आपल्या हसतच होतो. ते म्हणाले –"शुटिंग पॅक अप करू का?" आम्ही सांगितलं. "अण्णा, खरंच काहीच झालं नाही. पण हसू येतंय."

"मग शॉट घेऊ?" त्यांनी विचारलं. आम्ही म्हणालो हो. पण सेटवर गेल्या-नंतर पुन्हा हसू फुटलं.

शेवटी आम्ही गंभीर झालो. शॉट झाला. नंतर लगेच एक शॉट होता. त्यात मला थोडंसं हसायचं होतं. पण आता इतकी गंभीर झाले होते की हसूच फुटेना.

पण अण्णा कधीच चिडले नाहीत.

'रामजोशी'च्या अगोदरची गोष्ट. अच्युतराव रानडे 'फूल और काटे' हे पिक्चर काढणार होते. ललिता पवार त्यामध्ये होत्या. ललिताबाईंनी मला गळ घातली, "तूही काम कर यामध्ये." पिक्चरच्या पार्टनरनं मला काम करण्याचे ॲडव्हान्स पैसेही दिले.

त्याप्रमाणे मी स्टुडिओत गेले. मेकअप केला. माझा एक सीनही झाला. इत-क्यात माझ्या कानावर कुणकुण आली, अच्युतराव म्हणत होते, "कुणी आणलं हिला? हिला काम जमेलसं वाटत नाही."

मला राग आला. तसंच वाईटही वाटलं. सरळ त्या पार्टनरकडे गेले; म्हणाले, "हे घ्या तुमचे पैसे परत. मला नाही काम करायचं." तो म्हणाला "अहो पैसे कशाला परत करताय?"– पण ते ऐकायला मी तिथे नव्हतेच.

मी धसकाच घेतला. "हिला काम जमेलसं वाटत नाही," हे अच्युतरावांचं वाक्य जिवाला लागून राहिलं होतं. आपण खरे आर्टिस्ट नाहीतच असं मनाने घेतलं. घरी आले. भाईंना सांगितलं. ते म्हणाले, "मूर्ख आहेस– काम करता येत नाही म्हणजे काय? गाण्याचंही असंच केलंस!"

पण तरी बरेच दिवस मी धोक्यात होतेच– मला कामच करता येत नाही. मी आर्टिस्ट नाही. पुढे 'रामजोशी'त काम केलं. 'संत सखू'च्या वेळच्या गाण्यां-प्रमाणेच इथेही काम न करण्याचा हट्ट धरला असता तर?

पण मलासुद्धा हौस होतीच. त्यामुळे मी पुढे हा अपमान विसरले. आणि कामं केली. या लाईनमध्ये असंच होतं. एकदा पाऊल टाकलं, की ते खोलातच जातं. काम केलं नाही तर माणूस अस्वस्थ होतो. मॅड होतो.

म्हणून मला नेहमी वाटतं, बहुतेक नटया जे सांगतात की लग्नानंतर आम्ही

चित्रपट-संन्यास घेऊ, ते खोटं असतं. खऱ्या कलावंताची कलेची आस कधीच तुटत नाही.

## : ३ :

'रामजोशी' चं काम संपत आलं तेव्हा मला अनेक ठिकाणांहून कामासाठी बोलावणी येऊ लागली होती. हिंदी-मराठी चित्रपटांतली मागणी वाढली होती. मुंबईला 'वासुदेव बळवंत' मध्ये एक महत्त्वाचं काम होतं. कोल्हापूरला 'पाटलाचा पोर,' 'नवरा बायको,' आणि 'पंढरीचा पाटील' या तीन चित्रपटांचं एकदमच शुटिंग होणार होतं. तिघांनाही मी तारखा दिल्या होत्या आणि त्या जवळ येत होत्या.

'वासुदेव बळवंत 'मध्ये माझे काही शॉट्स् झाले होते. सेट तयार होते. पण त्यावरचे काही शॉट्स उगाच लांबणीवर पडत होते. विश्राम बेडेकरांना मी खूप वेळा सांगितलं, "सेट तयार आहेत तर शॉट्स घेऊन टाका ना! मला जायचं आहे."

पण शॉट्स झाले नाहीतच. सुमतीबाई गुप्ते तेव्हा गरोदर होत्या म्हणून त्यांचे शॉट्स अगोदर उरकून घेतले गेले. माझी जेव्हा दुसरे दिवशी कोल्हापूरला जाण्याची तारीख आली तेव्हा मी त्यांना कळवलं. "उद्या दुपारी तीनपर्यंत केव्हाही शॉट्स घेऊन टाका, मी मोकळी आहे."

दुसऱ्या दिवशी तीन-चार फोन केले, तरी बेडेकर फोनवर आलेच नाहीत. मी स्टेशनवर गेले, तेव्हा तिथे ते घाईघाईनं आले. ते म्हणाले, "सेट उभारलेला आहे. खर्च वाया जाईल."

मी म्हणाले, "आतापर्यंत मी मोकळी होते. तुम्ही शॉट्स् का घेतले नाहीत? मी कोल्हापूरला तारखा दिल्या आहेत. इथे थांबले तर त्या तिघांचेही पैसे वाया जातील."

ते म्हणाले, "बघा बरं. थांबला नाहीत तर भयंकर होईल."

मी म्हटलं, "काहीही सोसायची माझी तयारी आहे. नाहीतरी तुम्ही पैसे दिले नाहीतच."

कोल्हापूरचे पुढचे पंधरा दिवस माझे भयंकर गर्दीत गेले. पहिल्या चित्रपटाच्या आऊट डोअर शुटिंगला पन्हाळ्याला मी पहाटे पाच ते दुपारी दोन वाजेपर्यंत जात असे. नंतर दुसऱ्या चित्रपटाचं दुपारी तीन ते साडेसहा शुटिंग होई. आणि तिसऱ्या चित्रपटाचं काम संध्याकाळी सातला सुरू होई ते संपवून मी रात्री अडीच वाजेपर्यंत हॉटेलात परत येई. थोडे डोळे मिटले की लगेच पुन्हा उठून पहिल्या शुटिंगला हजर. सारखी फिरत होते. विश्रांती म्हणून नव्हतीच. पंधरा दिवस हा कार्यक्रम चालू होता. पंधराव्या दिवशी मेंदू काम करेनासा झाला. तोल जाऊ लागला होता. डोळ्यांच्या पापण्या मिटत होत्या. संवाद आठवेनात. हातात लिहून दिलेल्या कागदां-

वरचे संवाद दिसेनात म्हणून मुद्दाम मोठमोठे बोर्ड लावून त्यावर ठळक अक्षरांत संवाद लिहून ठेवले. ते मी वाचून बोले. कसंबसं शुटिंग पार पडलं.

'पंढरीचा पाटील'चं शुटिंग संपल्यावर कुणीतरी एक गाडी आणली होती. त्या गाडीतनं मी, आणखी एक-दोघं आम्ही पन्हाळगडावर गेलो. आणि तिथे धुमाकूळ घातला. बाटल्यांचे ढीगच्या ढीग रिकामे केले. रिकाम्या बाटल्यांचा दुसरा पन्हाळाच आम्ही तिथे रचला होता.

पन्हाळ्याहून परत येताना गंमत झाली. आमची गाडी रस्त्यात पेटली आणि आम्ही बाहेर पडलो. गाडीत काही फिल्म्स होत्या. त्या बाहेर काढण्याची आमची धांदल चालू होती. पण राजा पंडित कसला वस्ताद. तो सारखा ओरडत होता, 'अगोदर माझी पेटी काढा, त्यात बाटल्या आहेत. पेटी काढा.'

कोल्हापुराहून मुंबईला परतल्यावर मी बेडेकरांना फोन केला आणि विचारलं, "शुटिंग-बिटिंग काही आहे का?" त्यांनी सांगितलं, "तुम्ही गेलात आणि सेटचा खर्च फार होत होता म्हणून आम्ही तुमच्याऐवजी दुसरी बाई घेतली."

नंतर मला कळलं. माझी भयंकर बदनामी करणारा एक लेख 'तारका' या चित्रपट साप्ताहिकात मुद्दाम प्रसिद्ध करण्यात आला होता. केवळ आकसानं. मी लगेच कायदेशीर तक्रार केली तेव्हा खुलासाही आला.

'वंशाचा दिवा' वगैरे एक-दोन किरकोळ चित्रपट झाल्यानंतर माझा 'माणिक स्टुडिओ'शी करार झाला. 'माणिक'मधलं माझं पहिलंच पिक्चर होतं, 'पुढचं पाऊल'—

संत सखू, रामजोशी, पुढचं पाऊल आणि मी तुळस तुझ्या अंगणी- हे चित्रपट म्हणजे माझ्या चित्रपट जीवनातील चार महत्त्वाचे टप्पे मला वाटतात.

'संत सखू' माझा अत्यंत आवडता चित्रपट. त्यातली भूमिकाही माझी अत्यंत आवडती. 'रामजोशी'मध्ये मला अण्णांचं (व्ही. शांताराम) दिग्दर्शन लाभलं. 'रामजोशी' आणि 'पुढचं पाऊल' या दोन्हीही तमाशा चित्रपटांशी त्याची तुलना करता येणार नाही. पण कलेच्या दृष्टीनं मला 'रामजोशी'तील बयेपेक्षा 'पुढचं पाऊल' मधील तमासगिरिणीची भूमिका अधिक आवडली. आणि त्याहीपेक्षा 'मी तुळस तुझ्या अंगणी'तील तमासगिरीण मला अधिक सरस वाटते.

'पुढचं पाऊल' हा चित्रपट वेगळ्या धर्तीचा होता. माझी भूमिका 'व्हॅम्पीश' होती. चित्रपटासाठी सारी माणसं कशी जुळून आली होती. व्यंकटेश माडगूळकरांची पटकथा, माडगूळकरांची गाणी आणि संवाद, राजा परांजपे यांचे दिग्दर्शन, वसंत पवारांचे नृत्यदिग्दर्शन, सुधीर फडक्यांचे संगीत आणि पु. ल. देशपांडे, विवेक, कुसुम देशपांडे व स्वत: राजाभाऊ आणि माडगूळकर यांच्या समर्थ भूमिका—असा संच पुढं कधी जमला असेल असं वाटत नाही. यामुळेच चित्रपट खूप उठावदार झाला.

माणिक स्टुडिओतील पहिले काही दिवस मात्र मला काहीच करमलं नाही. तिथं मी नवीन होते. माझी कुणाशीच ओळख नव्हती. आणि मी कुणात फारशी मिसळ-तही नव्हते. पी. एल, बाळ बापट, राजा परांजपे, पोंक्षे वगैरे मंडळी एकमेकांच्या चांगल्याच परिचयाची होती. ते मोठमोठ्याने गप्पा मारीत, हसत. मी घाबरे व 'नर्व्हस' होई. कुणाशी बोलायचं हे कळेना. पहिला दिवस कसाबसा काढला. दुसऱ्या दिवशी काही डिटेक्टिव्ह पुस्तके घेऊन आले. आणि ती वाचत बसले.

इतर लोक म्हणत, "काय आखडू बाई आहे. बोलतदेखील नाही."

मलाही वाटे तेच 'आखडू' आहेत. शेवटी हळूहळू सगळ्यांत मी मिसळले आणि मग आमचा सगळ्यांचा मिळूनच एक ग्रूप तयार झाला.

'पुढचं पाऊल'चं शुटिंग चालू असतानाची एक गोष्ट आठवते. माझा आणि 'पु. लं.'चा एक सीन चालू होता. तो बघायला रांगणेकर आणि काही पत्रकार मंडळी आली होती. म्हणून सेटपुढंच रांगेने खुर्च्या मांडून ठेवल्या होत्या. मी 'पु. लं.'ना म्हटलं, आपण एक गंमत करू या का? सगळे समोर बसले असताना आपण अगदी गंभीरपणे सांगू–'आम्ही सर्वांसमोर काम करणार नाही.'

'पु. ल.' या गोष्टीला तयार झाले.

सगळी मंडळी आली. राजाभाऊ आले. आम्ही दोघे सेटवरच मख्खपणे बसून राहिलो. राजाभाऊंनी मला विचारलं, "काय झालं?"

मी म्हटलं,–"माफ करा, सेटवर कुणीही येऊ नये अशी इथं पाटी लावली आहे. समोर बसलेली मंडळी जेव्हा जातील तेव्हाच शुटिंग सुरू होईल."

राजाभाऊ म्हणाले–"पाहुण्यांना आपण आमंत्रण देऊन बोलावलं. त्यांचा अशानं अपमान होईल."

मी सरळ आपल्या खुर्चीवर जाऊन बसले. 'पु. ल.' सुद्धा म्हणाले–"बरोबर आहे. आम्ही काय सर्कशीतले वाघ–सिंह आहोत?–सगळ्यांसमोर कामं करायला आम्ही थोडीच सोंगं आहोत."

पंधरा मिनिटं झाली. तरी आम्ही शांतच होतो. वातावरण मात्र भलतंच तापलं होतं.

अखेर 'पु. लं.'ना राहवलं नाही.

–ते खदखदून हसू लागले. मग मीही हसू दाबू शकले नाही. सर्वांना जेव्हा खरा प्रकार कळला तेव्हा सारेच हसू लागले.

'माणिक स्टुडिओ'मध्ये कशी प्रथा पडली होती कुणास ठाऊक!–पण रंग-पंचमी खेळायची नाही असा नियम होता. त्या दिवशीतर सुटी मुळीच नसायची. एका रंगपंचमीच्या दिवशी शाहूराव व मी असं दोघांचं शुटिंग होतं. मी 'मेकअप' करायला गेले. मेकअपमन म्हणाला,

"बाई– तुम्हीच येता मेकअप् करायला, मग आम्हांला सुटी कशी मिळणार?"

"का ? " मी म्हणाले.

तो म्हणाला, " आज रंगपंचमी नाही का ? मालक सुटी देत नाही."

" असं होय. बघते मी "–मी म्हणाले. " चला आपण रंगपंचमीच खेळू."

असं म्हणून मी एक बादलीभर रंग घेतला आणि मालक बाळासाहेब पाठक यांच्या खोलीकडे गेले. बाळासाहेब आपल्या टेबलाशी बरेचसे कागदपत्र घेऊन बसले होते. मी गेले. हातांतील बादली–आणि एकंदर 'रंग' पाहून 'हे काय' 'हे काय' असे ते ओरडत असतानाच मी सरळ त्यांच्या अंगावर बादली उपडी केली. झालं. सर्व स्टुडिओभर रंगपंचमी सुरू झाली, नवनवीन सामानावर रंग उडाला. फर्निचर, भिंती, आणि इतर वस्तूही त्याला अपवाद नव्हत्या. रेकॉर्डिस्ट शंकरराव दामले घाबरले. ते कुंपणावरून उड्या टाकत लांब पळाले. तेवढ्यात राजाभाऊ परांजपे आले. कुणीतरी मला म्हणालं, त्यांच्या अंगावर फेकू नका. ते कधीच रंगपंचमी खेळत नाहीत. एका रंगपंचमीला त्यांची मुलगी का कोणसं वारलं होतं.

मग मी राजाभाऊंना म्हणाले, " राजाभाऊ, तुमच्या अंगावर रंग नाही टाकत. पण आज रंगपंचमी–म्हणून भेटायला तर हरकत नाही ना ? "

मी रंगाने भिजून ओलीचिंब झाले होते. तशीच राजाभाऊंना कडकडून भेटले आणि मग तेही रंगात भिजले !

राजा परांजपे आणि माझी प्रथम मुळीच ओळख नव्हती. बंदरकर 'नाट्यनिकेतन'मध्ये होते. तिथंच त्यांची व परांजपे यांची ओळख झाली. बंदरकरांचे मित्र म्हणून परांजपे घरी आले.

'पुढचं पाऊल'चं कॉन्ट्रॅक्ट बंदरकरांतर्फेच झालं. आणि बंदरकरांच्या आग्रहामुळेच मी राजाभाऊंच्या चित्रपटात काम करायला गेले.

हळूहळू आमची ओळख वाढू लागली. 'मी दुःखी आहे' असे ते सांगत. मला त्यांच्या कौटुंबिक जीवनासंबंधी काहीच माहिती नव्हती. मी त्याबद्दल उत्सुकताही दाखविली नाही. बंदरकरांचे मित्र म्हणून राजाभाऊ घरी येत आणि दिवसरात्र राहत. 'पुढचं पाऊल' साठी मी पुण्याला असताना सतत माझ्याकडेच असत.

'पुढचं पाऊल' आणि 'पारिजातक' हे दोनच चित्रपट मी राजाभाऊंच्या दिग्दर्शनाखाली केले. दिग्दर्शक म्हणून मला त्यांच्याविषयी फार आदर आहे. मी त्यांच्यावर फार विश्वास टाकला होता; पण त्याचं चीज झालं नाही.

'माणिक'च्या 'पारिजातक'चं शुटिंग सुरू होतं. मला रुक्मिणीचं व सुलोचनाबाईंना सत्यभामेचं काम मिळालं. 'पुढचं पाऊल' मध्ये मला जी भूमिका होती त्याच्या अगदी विरुद्ध ही भूमिका होती. सोज्वळ, शांत. काम करताना मला जरासुद्धा भिवई उडविता येत नसे. एका शॉटमध्ये मला किंचित स्मित करायचं होतं. पण त्या दिवशी म्हणे राजाभाऊंचं सुलोचनाबाईंशी खूप भांडण झालं होतं. म्हणून तो 'सीन' त्यांना जमत नव्हता, पसंत पडत नव्हता. ते भांडणाचा राग सारखे सेटवर

काढीत असत. वास्तविक पाहता हे चुकीचं होतं. कलाकार म्हटला की त्यानं सेट-वर आलं की बाकी सारं बाजूला ठेवून कलाकारच व्हायला पाहिजे. पण ते त्यांना जमत नसे आणि मला व इतर कलाकारांना ते सारखे नर्व्हस करायचे.

स्पष्ट आठवत नाही. पण माणिक स्टुडिओनंतर मला वाटते, मी पुन्हा प्रभातशी 'संत जनाबाई' साठी करार केला होता. प्रभातचं जुनं तेज, जुनं वैभव या वेळी पार गेलं होतं. माझ्या या वेळच्या 'प्रभात'च्या आठवणी आहेत वेगळयाच. त्या वेळी तिथे असणाऱ्या आम्हा दोघी-तिघी मुलींना वाटे आपण काहीतरी करून दाखवलं पाहिजे. आपण स्त्रिया असलो म्हणून काय झालं? आम्हांलादेखील पुरुषांसारखं वागता येतं. आणि हे सिद्ध करण्यासाठी आम्ही तिघीजणी पुण्याच्या रस्त्यावरून रात्रीबेरात्री टॅक्सीतून भटकत असू, हॉटेलात जेवत असू.

'पुढचं पाऊल'च्या वेळी तर, माझ्या डोक्यात काय सैतान शिरला होता कोणास ठाऊक! राजा परांजपे यांच्याजवळ तेव्हा मोटर सायकल होती. मी पुरुषासारखा लेंगा, सदरा आणि त्यावर कोट असा पोषाख करायची आणि त्यांच्या मागच्या सीटवर बसून गावभर भटकायची. पुरुषी पोषाखाची मला लहानपणापासून फार आवड. अगदी लहानपणीदेखील मी हाफ पॅंट आणि शर्ट घालून मुलासारखी सायकलवरून भटके.

'संत जनाबाई'च्या वेळची गोष्ट. त्या वेळी मी पुण्याला आले की वेलस्ली हॉटेलात राहत असे. ३१ डिसेंबरचा दिवस होता. ३१ डिसेंबर म्हणजे पिण्याचा दिवस. त्या-दिवशी बंदरकर मुंबईहून आले होते. कार्यक्रम आटोपला. मग राजाभाऊंनी आपली मोटर सायकल काढली. मी मोटर सायकलच्या मागच्या सीटवर बसले आणि राजा-भाऊ तुफान वेगात गाडी हाणू लागले. रात्रीची वेळ होती. धुंदी होती.

मी म्हणत होते, "आणखी जोरात गाडी चालवा, आणखी जोरात." आणि राजाभाऊ आणखीनच वेग वाढवीत होते. आम्ही औंध रस्त्यावर आलो होतो. हा माझा आवडता रस्ता. अनेक वेळा करमलं नाही म्हणजे मी या रस्त्यावर एकटीच टॅक्सीने येत असे.

या परिस्थितीचा व्हायचा तोच परिणाम झाला. वेगात असलेली मोटर सायकल एकदम मध्ये कुठेतरी घसरून पडली. आम्ही दोघेही उडालो. राजाभाऊंना चांगलाच मार बसला/मी मात्र निसटले.

त्याच मोटार सायकलवरून आम्ही परत आलो तेव्हा जवळजवळ शुद्ध नव्हतीच. ॲक्सीडेंट नेमका कसा झाला हेही मला आठवत नव्हतं.

पण एकाएकी काय झालं कुणास ठाऊक! त्या दिवसापासून माझे आणि राजा परांजपे यांचे संबंधच तुटले.

• • •

[ अपूर्ण ]

## कै. सवाई गंधर्व पुण्यतिथी

# एक खरं ठरणारं स्वप्न

"गायनाचा समारंभ सरला तरी मनोविकाराचा संस्कार जात नाही. भुईवर सांडलेले पाणी गेले, तरी ओल राहते!"

ज्ञानेश्वरी.

गणपती संपले की मला एक स्वप्न पडू लागतं. दिवसचे दिवस जातात आणि ते पडतच राहतं–एकेदिनी 'सकाळ'मध्ये जाहिरात झळकते. पहाटेची स्वप्नं खरी ठरतात की नाहीत कोणास ठाऊक? पण मला इतके दिवस पडणारं हे स्वप्न मात्र साकार होतं–ते स्वप्न होऊनच! तीन रात्री स्वप्नांसारख्याच जातात (काही श्रोत्यांच्या 'स्वप्नांत'ही जातात) आणि मग उरते हुरहूर लावणारी, अस्वस्थ करणारी, रेंगाळणारी मधुर स्मृती! रात्री लावलेल्या अत्तराचा सकाळी जसा मंद पण मधुर सुवास येत असतो तशा आठवणी–कलावंतांच्या, एखाद्या उमद्या वृत्तीच्या, मनाला स्पर्शून गेलेल्या एखाद्या सुराच्या, सारा मांडव थरकून सोडलेल्या आवाजीच्या, गहिवरून यावं अशा, कितीतरी हृद्य आठवणी!

हा महोत्सव आता इतका भव्य आणि लोकप्रिय होऊन बसला आहे की सुमारे दहा हजार श्रोते (उत्साहाने) येतात. साऱ्या भारतातले उत्तम कलाकार शोधून आणलेले असतात.–आणि या सर्वांना एकत्र आणणारा अदृश्य धागा असतो रसिकतेचा. पहिल्या दिवशी साडेआठलाच मांडव फुलून जातो. अफाट गडबड चाललेली असते. ओळखीचे, नेहमीचे, नवीन चेहरे दिसत असतात, 'रसिक' मनात नोंदी होत असतात, चर्चा–अंदाजांना उधाण आलेलं असतं, एखाद्या 'होतकरू' जनास 'हे भीमसेन', 'हे वसंतराव' अशा (लांबून) ओळखी करून दिल्या जातात.–तो विचारा सगळीकडेच आ वासून बघत असतो. कधीही बघितला नसेल असा भव्य शामियाना आणि सुशोभित मंच–मन प्रसन्न होऊन जातं. –आणि कोणाच्या तरी सनईने कार्यक्रमाला सुरुवात होते.

जेव्हा एखाद्या सुराला लक्ष देऊन वाहवा निघू लागते तेव्हा खरा महोत्सव सुरू होतो. पहिल्या दिवशी कार्यक्रम सुरू होऊन दोन-तीन तास झाले की सगळं ओळखीचं होतं, आपुलकी वाटू लागते आणि मग जे घरगुती वातावरण तीन दिवस निर्माण होतं ते तिथे येऊनच कळावं. कितीही वर्णन केलं तरी अनुभवाचा सच्चेपणा अनुभवूनच कळतो.

पहिल्या दिवशीचे (माननीय) पाहुणे कलाकार होते तबलानवाज खाँसाहेब

तिरखवाँ. पहिलीच थाप अशी खणखणीत वाजली की ब्याऐंशी या आकड्यावर विश्वास बसू नये. दीड तास त्यांच्या वाद्याने बोल जसे असावेत तसे काढले. स्वतः डॉ. वसंतराव देशपांडे लहरा धरून बसले होते. एकेकाळी लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या या वृद्ध कलाकाराने तरुण मनात आदर निर्माण केला.

श्री. कोमलसिंग सनई वाजवायला आले तेव्हा उत्सुकतेने सर्वजण स्तब्ध होऊन बसले होते. कारण ते सनईशिवाय सनई वाजवणार होते. तोंडासमोर पोकळ मूठ धरून त्यांनी जेव्हा पहिला सूर लावला, तेव्हा कौतुकाची एक लाटच सळसळत गेली तेंव्हाच त्यांना टाळ्या मिळाल्या—नंतरच्या तासभर त्या मिळतच राहिल्या. जणू काही एखादे 'शहनाई नवाझ'च वाजवत असावेत! डोळ्यांना दिसत असून विश्वास बसू नये अशी आमची स्थिती होती. एकही स्वर तकलादू नाही—अगदी सच्चा! तारसप्तकात एकएक सूर असा सणसणत जायचा! प्रथम राग जोग आणि नंतर गाराधुन 'वाजवली.' अगदी अतिद्रुतापर्यंत त्यांनी काही प्रकार वाजवायचा ठेवला नाही. वय?—फक्त एकवीस!

संगमेश्वर गुरवांचं गाणं अतिशय प्रसन्न—आवाज मुलायम. विलंबित रंगवत नेण्याची त्यांची पद्धत आनंददायक. राग गोरखकल्याण गायले. नंतर भजन—"आज सखि सद्‌गुरू घर आये, मोरे मनवानंद मनौरे"—विलक्षण मधुर गायले.

शेवटचा कार्यक्रम अमझादअलींच्या सरोदवादनाचा. देखणी आणि रुबाबदार मूर्ती. वय बावीस फक्त. रागाची आलापी अत्यंत दमदार झाली. वातावरण इतके सुरमय झालेले की आपणच तो राग आहोत असे वाटायला लागले. झाला प्रस्तुत केला तेव्हा जणू चराचर भरून गेले होते. झाल्याच्या अंताला श्वास रोखले गेले होते. गत तर केवळ बेजोड. पं. सामताप्रसादसारख्या कसलेल्या तबलियाला ते तिळभर उणे पडले नाहीत. प्रत्येक तुकड्याबरोबर आनंदाला उधाण यायचे. अशी बैठक फार क्वचित जमते. तयारी अफाट. भैरवी होऊन पहिल्या दिवशीचा कार्यक्रम संपला.

दुसऱ्या दिवशीचं एक प्रमुख आकर्षण होतं ते गंगूबाई हनगळांच्या गाण्याचं. रागाच्या अनोळखीपणामुळे रंगतीला बाध आला—म्हणजे सामान्य श्रोते समरस होऊ शकले नाहीत. राग चक्रधर. मुद्दाम उल्लेख करायला हवा तो त्यांच्या कन्येचा—कृष्णाबाई हनगळ यांचा. तयारी अगदी पक्की. शिवाय शगिरुद्दीन यांच्या सारंगीनं आणि अप्पासाहेब जळगावकरांच्या पेटीने फार रंगत आणली. पावसाला श्रोत्यांनी अजिबात जुमानलं नाही तेव्हा तो निघून गेला.

गिरिजादेवी हल्ली लोकांच्या फार आवडत्या गायिका आहेत असे म्हटले तर चूक ठरणार नाही. पहिल्या क्षणापासूनच त्यांनी सर्व मनांचा ताबा घेतला. मालकंस राग आधीच विलक्षण आर्त, त्यांत असा काही रंग जमत गेला की दाद देण्याशिवाय उठून आणखी काहीतरी करावं असं वाटू लागलं. मनं फारच उचंबळून आली होती. माझ्या मते ही बैठक तीनही दिवसांत सर्वोत्कृष्ट ठरावी. नंतरच्या ठुमरीद्वारे अविस्म-

रणीय भावदर्शन झाले–" शाम मोरी नैय्या कैसे लागो पार·" एकोक्षणी विरहिणीची व्यथा तर दुसरीकडे भक्तीचा उत्कट भाव (–हे त्यांनी स्वतःच फोड करून दाखवले). कायम लक्षात राहील.

दुसऱ्या दिवशीचे पाहुणे कलाकार होते जितेन्द्र अभिषेकी ! गायनाबरोबरच नाटकांमुळे ते लोकप्रिय झालेले आहेत. यांचा आवाज पहाडी, वजनदार ! भरीवपणा आणि आवेश हे वैशिष्टय. एकेक सूर विलक्षण पिळदार, सच्चा, गदगदून येणारा ! भरदार तानांची बरसात. मूर्तिमंत चापल्य. समेवर येतानाची आवेशयुक्त फेक–सगळंच लक्षात ठेवण्यारखं. राग नटभैरव गायल्यानंतर भोपालतोडीने वातावरण पार बदलून टाकलं. नंतरची भैरवी वेगळी वाटल्याने लक्षात राहील.

तिसऱ्या दिवशी चकित केलं ते मालिनी राजुरकरांनी आणि निराशा केली डी. के. दातारांनी. काहीतरी अविस्मरणीय ऐकायला मिळणार अशी आशा होती. पण कदाचित् त्यांचा ढंग गायकी असल्याने असेल. अपेक्षा पूर्ण झाली नाही. चन्द्रकांत कामतांची साथ चांगली झाली. मालिनी राजुरकरांनी कलावतीत ' तराना ' गाऊन सगळ्यांना चकित केलं, आणि फार थोडया वेळात टाळया मिळवल्या. तयारी अगदी निर्दोषः नंदकुमार ( शेख दाऊद खाँ यांचे शिष्य ) यांची तबल्याची साथ फारच सुरेख झाली. कोणत्याही प्रकारचे प्रदर्शन न करता स्पष्ट तबला वाजला. चन्द्रकान्त कपिलेश्वरी या आता प्रसिद्ध झालेल्या उमद्या गायकाने ' बैरागी ' आळवला. सुरांची पूर्णता आली नाही तरी सारेगम आणि तानांची पद्धती चांगली. प्रभुदेव सरदार अनपेक्षित आणि चांगले गायले. ललतनंतर " विलोपले..." पहिलेच मराठी पद.

फिरोज दस्तुर हे एक आवडते गायक. आपल्या प्रसिद्ध मधुर आवाजात त्यांनी बागेश्री आळवून आपल्या भक्तांना संतुष्ट केले. आणि आग्रह होण्याआधीच "गोपाळा"ची सुरुवात करताच टाळयांचा एकच कडकडाट झाला. "गोपाला"–चा प्रश्नच नाही. डोळयांत पाणी आणण्याइतके सामर्थ्य त्यांच्याकडेच आहे.

तीन दिवस तीन नृत्ये झाली. मंदा मालवीय यांच्या नृत्यात पं. सामताप्रसाद लक्षात राहिले. माया चॅटर्जी या बंगाली चौदा-पंधरा बर्षांच्या मुलीचे नृत्य म्हणजे प्रचंड आत्मविश्वास आणि तयारी यांचे दर्शन. पं. सामताप्रसादांना तिने ज्या जिद्दीने आणि आवेशाने साथ दिली ती कौतुकास्पद होती. दहा वर्षांच्या किशनमोहनचे नृत्य चांगले तर झालेच व लहान म्हणून कौतुकाचेही ठरले. प्रत्यक्ष शंभूमहाराजांचा मुलगा– तयारीबद्दल वादच नाही !

पं. गोपाल मिश्रा हे एक अत्यंत थोर कलाकार. त्यांची आपण स्तुती करायची हे देखील धाडसाचे वाटते. त्यांची सारंगी आणि पं. सामताप्रसादांची साथ हा एक स्वतंत्र निबंधाचा विषय व्हावा.

वसंतरावही असेच. राग सालकपराळी. अत्यंत रंजक बैठक. नंतर श्रोत्यांच्या आग्रहास्तव ' संन्यस्त खड्ग 'मधील पद उत्तम झाले. ( बिलासखानी तोडी ).

सरतेशवटी पं. भीमसेन जोशी (–आपले सर्वांचे आवडते गायक– निवेदक) आले. नेहमीप्रमाणे त्यांनी आग्रहाने मंच भरून टाकला आणि अखेर समाधानाने बसले. आधी त्यांनी सांगितलेले दोन शब्द चांगले होते– "ही भीमसेन जोशींची मैफिल नाही, त्याने वाहिलेली श्रद्धांजली आहे– हे लक्षात ठेवा." राग लोकप्रिय– मियाकी तोडी. त्यांचे नुसते नाव घेतले तरी कौतुकाने मन भरून येते. आणखी एका कारणाने ही बैठक आयुष्यभर लक्षात राहील– पं. गोपालमिश्रांची कमालीची साथ ! प्रत्येक सूर उचलून धरण्याचा त्यांनी चंगच बांधला होता. दोन–चार बोल-ताना आधीच घेतलेल्या असायच्या. कितीवेळा त्यांनी आम्हांला स्वर्गात नेऊन सोडले याची गणतीच नाही. प्रत्येक सूरच काळजाला जाऊन भिडत होता. एकदोन वेळा तर हृदयातूनच काढल्यासारखा करून आलाय– डोळ्यांत अश्रू तरारले. "बिन देखे पडे नाही चैन"– पहिल्यांदा भीमसेन आणि नंतर कै. सवाई गंधर्वांची ध्वनिमुद्रिका. ते करुण सूर अजून कानात घुमत आहेत– घुमणार आहेत.

**– प्रकाश साठे**

**रसभंग**

कार्यक्रम इतका चांगला होतो, पण अजून काही मुद्दाम केल्या जाणाऱ्या (तरुण मुलांच्या) चाळ्यांवर नियंत्रण कसे होत नाही ? चांगल्या बैठकीच्या मध्येच संगीतात काहीच रस नसलेले !( आणि वरच्या स्लॅबवर बसणारे ) हे लोक किती वर्षे आचरटपणा आणि रसभंग करीत राहणार ? स्वयंसेवक खुर्चीवर बसण्याखेरीज काही करताना मला तरी दिसले नाहीत.

व्हरांड्यातून ऐकण्याखेरीज इतर उद्देशाने फिरणाऱ्या याच जातीच्या लोकांकडून स्त्री-समुदायास किती त्रास होतो हे कोणी पाह्यले नाही काय ?

एवढ्या मोठ्या नियोजनात हे दोष कसे ?

**पं. सामताप्रसाद**

पं. सामताप्रसाद यांचा उल्लेख केल्याशिवाय राहवतच नाही. भीमसेन खालोखाल किंबहुना तितकीच लोकप्रियता त्यांनी संपादन केली आहे. दर वेळी हे मंचावर येताना टाळ्यांचा जो कडकडाट होतो आणि चेहऱ्यांवर आनंद फुटतो तेव्हा याची खात्री पटते. कार्यक्रम चांगला होण्यात यांचा किती टक्के हातभार लागतो हे ठरवणेदेखील कठीण.

त्यांचा सोलो अर्थातच अत्यंत सुंदर झाला. पाऊण तास मिनिटासारखा गेला. इतर सर्व तबले ऐकले तरी तो हात, ती मूर्ती, तो आवाज काही मनातून हलत नाही.

## राशी भविष्य : श्री. श्री. गो. जोशी : सायनाचार्य

दिनांक ३ डिसेंबर ते ९ डिसेंबर १९६६

**मेष** :– षष्ठातील मंगळ निर्धार, निष्ठेचे प्रतीक समजला जातो तर सुखस्थानातील गुरू महन्मांगल्याचा उद्गाता म्हणून ओळखला जातो. ही ग्रहस्थिती तुमचे कर्तृत्व निरपवाद असल्याचे सिद्ध करू शकेल. व्यवहारक्षेत्रात, राजकीय वातावरणात सदैव आघाडीवर राहण्याचा मान केवळ तुम्हांलाच लाभेल.

आपले व्यावसायिक क्षेत्र कोणतेही असो, प्रतिज्ञेने यश मिळवाल. तुमच्या गतिमान प्रगतीच्या आड येणाऱ्यांना ठोकरून काढू शकाल. कला–क्रीडा क्षेत्रांतील व्यक्तींच्या वाटयाला विक्रमी यश लाभावे.

कलावंतांच्या प्रतिमेचा उन्मेष बहरेल, व्यावसायिकांवर लक्ष्मीची कृपा होईल. राजकीय वतुळात तर तुमच्यावरच साऱ्यांच्या नजरा खिळून राहतील.

दूरचा प्रवास करण्याचे ठरेल, मंगलकार्ये अपेक्षेप्रमाणे पार पडतील.

दि. ५–७–८ डिसेंबर या कालावरच सारे लक्ष केंद्रित करा.

**वृषभ** :– गेल्या आठवडयातील सूर्य-गुरू त्रिकोणापासूनच तुमचे अडलेले गाडे गती घेऊ लागेल. आता रेंगाळणे, मागे राहणे, घोळ घालीत बसणे हे सारे विसरून जाऊ शकता. निश्चित, भरीव ठशीव कार्य करण्याचा काल हाच. पराक्रमस्थ गुरूतील अनन्यसाधारण सामर्थ्याचा आता आपणांस पदोपदी साक्षात्कार घडू लागेल. निर्धार-निष्ठेचे व्रत घेणाऱ्या माणसांना अपयश सहसा येऊ शकत नाही.

स्थानांतर, स्थित्यंतर, बदल किंवा परदेशगमन यांपैकी कोणतीही गोष्ट या वेळी घडून यावी. निर्णायक अवस्थेवर आपण आला आहात. सारासार विचाराने जे काही करायचे ते त्वरित करा आणि त्याचे महत्तम यशही पदरी पाडून घ्या. पराक्रमस्थ गुरूचे हे आवाहन आहे.

आगामी ८–१५ दिवस फारच घाईगर्दीचे जाणवतील. अनंत कार्यांचा डोंगर उपसावा लागेल. राष्ट्रीय दौऱ्यावरही कदाचित् निघावे लागेल.

दि. ६–७–८ अनेक संस्मरणीय गोष्टी घडतील.

**मिथुन** :– मिथुन राशीची माणसे बुद्धिमान आणि कर्तृत्वसंपन्न असतात असा त्यांचा लौकिक. पण या वेळच्या चौथ्या मंगळाने तुम्हांला अगदी निःष्प्रभ करून टाकले आहे. कुठेही जा, काहीही करा, मनासारखे काही घडतच नाही. नाही म्हणावयास एकटा गुरूच काय तो तुमच्याशी एकनिष्ठ आहे. तुमच्या निर्धाराचे, निष्ठेचे श्रेय देईल तो गुरूच.

वैचारिक संघर्ष निर्माण व्हायला लागतील. व्यावसायिक परिस्थिती स्फोटक बनू लागेल. प्रकृतिमानही काहीसे नरम गरम जाणवेल. असे असूनही तुमच्या

अंगीकृत कार्यात अपयशाचा डाग सहसा लागू शकणार नाही. या वेळी तुमचे अंदाजपत्रक साफ चुकेल, सारी कामे गतिहीन बनू लागतील. या वेळी तुमचा निर्धार आणि निष्ठाच तुमच्या उपयोगी पडेल.

मंगलकार्ये निर्विघ्नपणे पार पडतील. अनेकांचे सहकार्य लाभेल. ईश्वरी साक्षात्काराचा प्रत्यय पदोपदी यायला लागेल. दि. ४–५–७–८ या काळी वरीचशी कामे हातावेगळी होतील.

**कर्क** :– या वेळी एकटा पराक्रमस्थ मंगळही लाख मोलाचे साहाय्य करू शकेल. शिवाय सूर्य-गुरूंची सहानुभूती तुमच्या पाठीशी उभी राहीलच. गेल्या महिन्यातील सारे व्याप आणि संताप इतिहासजमा होतील. तुमच्या कर्तृत्वाला खरी धार चढेल या वेळीच. व्यावसायिक प्रगतीला उधाण येईल, भाग्याला तुफान होईल.

साहित्यिकांना, कलावंतांना, यंत्रतंत्र विशारदांना तर हा एक कपिलाषष्ठीचा योग वाटेल. आगामी दीड–दोन महिन्यांच्या कालावधीत चिरंतनस्मृतीच्या अनंत घटना भराभर घडून यायला लागतील.

अनपेक्षितपणे बदली-बढतीचे योग यायला लागतील. न होण्यासारखी कामे सहजासहजी होऊन जातील.

आरोग्य निवळेल. स्थावराच्या समस्या सुटतील. तुमच्या प्रगतीचे आजवर न सुटलेले गणित याच वेळी झटपट सुटेल. एवढेच नव्हे तर तुम्हा तूळराशी व्यक्तींपैकी काही भाग्यवंतांना परदेशास जाण्याचीही संधी लाभावी.

दि. ६–७–८ सर्वोत्तम. यशदायी दिवस हेच.

**सिंह** :– शनी मार्गी झाल्याने थोडेफार स्वास्थ्य लाभेलही. पण संपूर्ण सुख स्वास्थ्य लाभण्यासाठी अजूनही काही दिवस आपणांस वाट पाहावी लागणार आहे. तुमची घडपड, धावपळ वाया जाणार नाही. इतपतच हा काळ अनुकूल आहे.

सध्या तुमच्या मुखस्थानी मंगळ आहे. सहज काही बोलाल आणि ते दुसऱ्याच्या जिव्हारी लागेल. संयम शांततेचे व्रत याच वेळी घ्यायला हवे.

वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्यात फारसे यशस्वी व्हाल असे दिसत नाही. प्रकृतीच्या बाबतीत सतत काळजी घेऊनही फारसे चांगले आरोग्य राहील असे वाटत नाही. कष्ट अमाप आणि यश माफक असे या कालाचे स्वरूप आहे.

नोकरीधंद्याचा प्रश्न अपेक्षेप्रमाणे सुटणे कठीण. नको ती माणसे समोर टपकतील. नाही त्या ठिकाणी बदली होईल. पण सिंहराशी व्यक्तींवर निसर्ग सदैव प्रसन्न असल्यामुळे या अनिष्टतेमधूनही आपण आपले अपेक्षित कार्य साधू शकाल. दि. ५–७–९ अनेक कामे हातावेगळी करावी लागतील. प्रवासही घडेल.

**कन्या** :– सूर्य पराक्रमात, गुरू एकादशात, एवढी अत्युत्तम ग्रहस्थिती आज कित्येक वर्षांनी आपण अनुभवीत आहात. अगदी गणिताच्या काटेकोर भाषेत सांगायचे झाल्यास पुन्हा १२ वर्षे तरी अशी ग्रहस्थिती आपणांस दिसू शकणार नाही. आपल्या

जीवनातील बहुतेक साऱ्या आशाआकांक्षा याच वेळी सफल व्हाव्यात.

आपले व्यावसायिक क्षेत्र कोणतेही असो–प्रतिज्ञेने यश, विक्रमी यश मिळवाल. तुमच्या गतिमान प्रगतीच्या आड सहसा कोणीही येऊ शकणार नाही.

नोकरीतील सर्वोच्च प्रतिष्ठेचे स्थान तुमच्यासाठीच राखून ठेवण्यात येईल. यांत्रिक उत्पादन, परराष्ट्रीय राजकारण, अर्थशास्त्रीय लेखन हे आपले खास स्थान. त्यामध्ये या वेळी कधी नव्हते एवढे यश लाभेल.

दि. ३–४–७–८–संस्मरणीय. चांगल्या घटना याच काली घडाव्यात.

**तूळ** :– मंगळ मागे, सूर्य पुढे, उग्र ग्रहांच्या कोंडीत सापडला आहात. ही कोंडी फोडून बाहेर पडण्याचे सामर्थ्य तुमच्यात खासच आहे. पण क्षणकाल गोंधळल्या-सारखे जाणवेल.

या वेळी एकटा दशमस्थ गुरुच तुमच्याशी एकनिष्ठ आहे. तो प्रतिष्ठेला धक्का लागू नये म्हणून सतत तुमची पाठराखण करीत राहील. पण सांपत्तिक खर्चाचा वाढता ओघ थोपविणे मात्र त्याच्या आटोक्याबाहेरचे आहे.

या वेळीच हितशत्रूंच्या कारस्थानांना ऊत येईल, विरोधक निष्कारण प्रगतींत अडथळे वाढवू लागतील. प्रत्यक्षात होणार नाही काहीच. 'क्षमा वीरस्य भूषणम्' हे तत्त्व आचरणात आणलेत तर कुठेच काही बिघडणार नाही.

दि. ४–५–६ डिसेंबर सर्वोत्तम काल.

**वृश्चिक** :– मंगळ एकादशात–गुरु भाग्यात. तुमच्या जीवनातील अधिकाधिक

## रेल्वे आणि अपत्यसंभव

इजिप्तमध्ये परवापरवापर्यंत अशी समजूत प्रचलित होती की, एखाद्या स्त्रीला जेव्हा मूल व्हावयास नको असेल त्या वेळी ती आगगाडीच्या रुळांच्या मध्ये उताणी झोपून राही. ज्या वेळी त्या रुळांवरून आगगाडी भरधाव जाई त्या वेळी जगून वाचून ती स्त्री सुखरूप राहिलीच तर तिला त्यापुढे मुले होणार नाहीत असे समजले जाई. मुलांना कंटाळलेल्या अनेक स्त्रिया या भयंकर दिव्यातून जात असत. आणि रेल्वेचे इंजिन ड्रायव्हरही रुळांमध्ये पडलेली स्त्री पाहून तिला वाचवण्यासाठी आगगाडी थांबवण्याचा प्रयत्न न करता तिचा हेतू लक्षात घेऊन मनातल्या मनात देवाची प्रार्थना करत बिचारीला तिच्या प्रयत्नांत यश येवो, असे म्हणून पूर्ण वेगात आगगाडी नेत असेत.

या समजुतीचा दुसरा भाग असा की, एखाद्या स्त्रीला मूल होत नसेल, तेव्हा ती याउलट रुळांमध्ये पालथी झोपत असे आणि यातून सहीसलामत सुटल्यास तिची अपत्यहीनता आपोआप नष्ट होई. –भ्रमर

सुखासमाधानाचे—अपेक्षासाफल्याचे क्षण याच काळी अनुभवाल. याच वेळचा एकटा भाग्यस्थ गुरू भविष्यकालीन यशाची ग्वाही देऊ शकेल. याच आठवड्या-पासून तुमच्या साऱ्या स्थगित योजना गती घेऊ लागतील. अंगीकृत कार्याचा विकास करण्याचे तुमचे स्वप्न येथूनच साकार होऊ लागल. संपन्न व्यक्तींचे हार्दिक सहकार्य लाभेल, राजकीय वर्तुळात काही भरीव स्थान लाभेल.

ग्रहांनी तर अनुकूल कौल दिलेला आहेच. थोडासा प्रयत्न करताक्षणीच अनन्य-साधारण यश पदरी पडेल. दूरचे प्रवास घडतील, नोकरीत बढती—बदलीचे योग येतील, मंगलकार्ये निर्विघ्नपणे पार पडतील.

दि. ६ ते ८ अनपेक्षितपणे फार मोठे लाभ पदरी पाडून घ्याल.

**धनू** :—या वेळी अनेक ग्रह आपल्या व्ययस्थानातून संचारू लागले आहेत. ते तुमच्या प्रतिष्ठेला धक्का लावू शकणार नाहीत, पण तुमच्या हितशत्रूंना चेतवण्याचा प्रयत्न करतील. सांपत्तिक स्थिती तर बरीच केविलवाणी बनवतील.

मनात विचारांचे वादळ उठेल, विचारात धरसोड निर्माण होईल, कृतीत काहीच ताळमेळ राहणार नाही. एकटा मंगळ काय तो तुमच्याशी सहकार्य करण्यास उद्युक्त दिसतोय. पण तेवढ्या एका भांडवलावर तुम्ही उभारलेला व्यवहार-धंद्याचा डोलारा सावरला जाईलच असे खात्रीने सांगता येणार नाही.

या वेळी तरी निदान व्यावहारिक साहसाला उद्युक्त होऊ नका आणि भावनेच्या आहारी जाऊन लोकांना तोंडभर आश्वासन देऊ नका. आगामी कालही फारसा

## निष्पाप तरुणांचे कंमरपट्टे !!!

दक्षिणपूर्व रशियातील स्त्रियांमध्ये प्रचलित असलेल्या पुढील समजुतीची नोंद एफ्. एस्. क्राऊस ( F. S. Kraus. ) या समाजशास्त्रज्ञाने करून ठेवली आहे.

अपत्यसंभवाच्या नैसर्गिक आपत्तीतून मुक्ती मिळवण्यासाठी अशा स्त्रिया स्मशान भूमीतून पुरलेल्या प्रेतांपैकी तरुण मुलांच्या कमरेचे कमरपट्टे चोरून आणत आणि स्वतःच्या कमरेत ते सतत घालून ठेवीत. या कमपट्ट्यांच्या मांत्रिक प्रभावाने जोपर्यंत तो कमरपट्टा त्या स्त्रीच्या कंबरेस आहे, तोपर्यंत तिला मूल होणार नाही. मग कमरपट्टा अनवधानाने वापरण्याचे विसर-ल्यास मूल होण्याची शक्यता सांगितली जाई. मात्र असे मंत्रसामर्थ्य असणारे कमरपट्टे हे निष्पाप तरुणांच्या कंबरेतलेच असले पाहिजेत, अशी अट मानली जाई. त्यामुळे कमरपट्टा वापरूनही स्त्रीला मूल झाल्यास तो दोष तो विशिष्ट तरुण निष्पाप नसल्यामुळे निर्माण झाला, असे सोयीस्कररीत्या समजले जाई.

—भ्रमर

आशादायक दिसत नाही.

दि. ७–८–९ एवढेच दिवस काहीसे अनुकूल व स्वास्थ्याचे जाणवतील.

**मकर** :– एकटा भाग्यातील मंगळही तुमचे कर्तृत्व निरपवाद असल्याचे सिद्ध करू शकेल. शिवाय सूर्य-बुधादी ग्रह तुमच्या लाभस्थानी आहेतच.

गेल्या महिन्याभरातील सारे पेचप्रसंग आता भराभर सुटायला लागतील. वैचारिक संघर्ष मिटेल, व्यावहारिक अडीअडचणी चुटकीसरशी दूर होतील. आरोग्य निवळेल, स्थावरांच्या समस्या सुटतील, वाहनाची विवंचना मिटेल. नोकरचाकरांसंबंधी डोकेदुखी एकदम थांबेल.

अगदी स्पष्ट सांगायचे म्हणजे या वेळी अंतरिक्षातील सारे ग्रह तुमच्यावर फिदा झाल्यासारखे दिसू लागतील. अपयश, अवहेलना, अपेक्षाभंग इ. प्रकार आता आपण पूर्णत्वाने विसरू शकता. दूरचे प्रवास घडतील. बदली-बढतीची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतील. दि. ६ ते ९ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**कुंभ** :–मंगळ अष्टमांत असला तरी अनेक समर्थ ग्रह आपल्या दशमस्थानी आलेले आहेत. राहूसारखा कर्तृत्वसंपन्न ग्रह पराक्रमातून संचारत आहे. या आठवड्यात किंवा आगामी १५–२० दिवसांत आपल्या जीवनात अनंत चिरस्मरणीय घटना घडू लागतील. शनी मार्गी झाला तेव्हाच त्याने असे जाहीर करून टाकले की, कुंभराशी व्यक्तींना आता साडेसाती आहे–नाही सारखीच.

नवे स्नेहसंबंध जुळून येतील, इष्टमित्रांचे सहकार्य लाभेल, प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील आणि तुमच्या उज्ज्वल चारित्र्यापासून जगाने धडा घ्यावा असे काही भव्य–दिव्य कार्य आपल्या हातून घडेल.

दि. ७–८–९ अत्युत्तम काल.

**मीन** :– शनि-मंगळ आपणांस फारसे अनुकूल नाहीत म्हणून बेचैन बनू नका. गुरू पंचमात आणि सूर्य-शुक्र भाग्यात. हे दोन ग्रहही तुम्हांला हवं ते द्यायला कटिबद्ध आहेत. थोडक्यात आणि स्पष्टपणे असे सांगावेसे वाटते की, वर्तमानकालीन परिस्थितीची खंत न बाळगता नजीकच्या उज्ज्वल भविष्यकालावर दृष्टी ठेवून निर्धाराने वाटचाल करू लागलात तर लवकरच असे प्रत्ययास येईल की, अपेक्षासाफल्याचा क्षण फारसा दूर नाही.

सातव्या मंगळामुळे थोड्याफार कौटुंबिक कटकटी निर्माण होतीलही. पण अशा गोष्टींकडे फारसे लक्ष द्यायलाही तुम्हांला वेळ नाही. अनंत कामांचे डोंगर उपसायचे आहेत. कार्यक्षेत्रावरच सारे लक्ष केंद्रित केलेत तर आपल्या भेटीस अपयश कदापि येऊ शकणार नाही. दि. ३ ते ५ अनुकूल दिवस. ●

**'आणि ड्रॅगन जागा झाला'......ही लेखमाला 'सांगत्य ऐका' या लेखमालेनंतर सुरू करीत आहोत.** **सं.**

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

MANOOS (Weekly) | 40 Paise | Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**